# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**कोपरगाव उपकेंद्रातून कोपरगाव ते एमआयडीसी नवीन ३३ के.व्ही.वीजवाहिनी टाकण्याबाबत**

**(१) २७११७ (१८-०१-२०२२). श्री.आशुतोष काळे (कोपरगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगाव येथील औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना सातत्याने येत असलेली विजेची अडचण सोडविण्यासाठी या ३३/११ के.व्ही. एमआयडीसी उपकेंद्रासाठी १३२ के.व्ही कोपरगाव उपकेंद्रातून कोपरगाव ते एमआयडीसी नवीन ३३ के.व्ही.वीजवाहिनी टाकणेबाबत परिसरातील उद्योजकांकडून मागणी होत आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कोपरगांव यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

कोपरगांव येथील औद्योगिक वसाहतीत वारंवार विद्युत पुरवठा खंडित होण्याबाबत कोपरगांव औद्योगिक सहकारी वसाहत (इस्टेट) सोसायटी लि. यांचे दि. ०७.०७.२०२२ चे निवेदन महावितरणच्या क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(२) कोपरगांव औद्योगिक वसाहतीस १० एमव्हीए क्षमतेच्या ३३/११ के.व्ही. एमआयडीसी उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जातो. ३३/११ के.व्ही एमआयडीसी उपकेंद्रासाठी ०.७ कि. मी. लांबीची स्वतंत्र ३३ के.व्ही. उपरीमार्ग वाहिनी व १.६४ किमीची ३X३०० sqmm ची भूमीगत वाहिनी ही २२०/१३२/३३ के.व्ही. कोपरगांव उपकेंद्रातून काढण्यात येऊन दि. २०.०८.२०२२ रोजी सदरील वाहिनी कार्यान्वित करण्यात आलेली आहे. त्यामुळे ३३ के.व्ही. एमआयडीसी उपकेंद्र व ३३/११ के.व्ही. वारी उपकेंद्र हे दोन्ही स्वतंत्र वाहिनीवर जोडल्यामुळे वाहिनीवर होणारे बिघाड कमी होऊन औद्योगिक वसाहतीतील ग्राहकांना सद्यस्थितीत सुरळीत वीज पुरवठा होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई म्हाडाच्या वितरीत केलेल्या भूखंडावर लाभार्थींनी बांधकाम न करता अटी, शर्ती व नियमांचे उल्लघंन केल्याबाबत**

**(२) ३२७१४ (११-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाकडून मागील तीस वर्षात वितरीत करण्यात आलेल्या मुंबईतील तब्बल ४२७ भूखंडावर लाभार्थी भूखंडधारकांनी कोणतेही बांधकाम न करता कराराचा भंग केल्याप्रकरणी मुंबई मंडळाने सदरहू लाभार्थी भूखंडधारकांना नोटीस बजावण्याचे आदेश मुंबई मंडळाने दिनांक १८ सप्टेंबर,२०२१ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ४२७ लाभार्थी भूखंडधारकांची नावे काय आहेत,तसेच त्यास ३० वर्षे इतका कालावधी होऊनही अद्याप सदर भूखंडाचा वापर न करण्याची व त्यास लागलेल्या विलंबाची सर्वसाधारणे कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणात लाभार्थीने भूखंड वितरीत करताना करण्यात आलेल्या करारातील अटी व शर्तींचे स्पष्टपणे उल्लंघन केले असतानाही लाभार्थींना नोटीसा पाठवून उक्त भूखंड त्वरीत ताब्यात घेण्याबाबत अद्याप म्हाडातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, संबंधित दोषी लाभार्थींविरुद्ध आर्थिक संगनमताने कोणतीच कारवाई केली नसल्यास, शासन व म्हाडाचे नुकसान करणाऱ्या संबंधित दोषी म्हाडा अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) व (२) म्हाडाच्या मुंबई मंडळाकडून राबविण्यात आलेल्या जागतिक बँक प्रकल्पांतर्गत एकूण ४०४ भूखंडाची सन १९९४ मध्ये अत्यल्प, अल्प व उच्च उत्पन्न गटासाठी जाहिरातीव्दारे सोडत काढण्यात आली .
तथापि, सन १९९५ मध्ये मा . सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण निर्बंध तरतूदीनुसार सदरचे भूखंड हे कांदळवन बाधित (CRZ) असल्याने, या भूखंडाचा विकास करण्यास दि .०९/०३/१९९५ रोजी (Status quo) "जैसे थे" ठेवण्याचे आदेश दिले ले आहेत.
सदरहू प्रकल्पातील २७४ भूखंड हे CRZ ने बाधीत असल्याने भूखंडधारकांना विकसनास परवानगी देण्यात आलेली नाही. तर ७३ भूखंडधारकांनी अटी व शर्तींचा भंग केला असल्याने त्यांना नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. ११ भूखंडावर बांधकाम झालेले आहे तर १८ भूखंडाचे वितरण रद्द करुन भूखंड मुंबई मंडळाच्या ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. १४ भूखंडाचे वितरण झाले मात्र ताबा प्रलंबित आहे. ५ भूखंडाच्या बांधकामास मुदतवाढ देण्यात आली असून ९ भूखंडाच्या वितरणाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(३), (४) व (५) उपरोक्त नमूद ७३ भूखंडधारकांनी /संस्थांनी म्हाडासोबत केलेल्या भाडेपट्टा करारनाम्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन केले असल्याने त्यांना म्हाडाकडून नोटीसा देण्यात आलेल्या आहेत, अशा भूखंडधारकांना/संस्थांना करण्यात आलेले भूखंडाचे वितरण रद्द करण्याची बाब म्हाडाच्या विचाराधीन आहे.

---

## कुळगाव (जि.ठाणे) बदलापूर नगरपरिषद येथे चोरीच्या घटनेत वाढ झाल्याबाबत

**(३) ३३५१८ (०६-०१-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव (जि.ठाणे) बदलापूर नगरपरिषद येथे माहे जून ते ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पाच महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात घरफोडी करुन चोरीच्या घटना घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार घरफोडीच्या किती घटना घडल्या असून किती गुन्ह्यांचा तपास करण्यात आला आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) व (२) ठाणे पोलीस आयुक्तालयातील कुळगांव नगरपरिषद हद्दीतील बदलापूर पूर्व व बदलापूर पश्चिम पोलीस ठाण्यात जून, २०२१ ते ऑक्टोबर, २०२१ या कालावधीत दाखल असलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यांची माहिती खालीलप्रमाणे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बदलापूर पूर्व | १८ | १० | ६९१६४५ | २८५७६१ | १५ |
| २ | बदलापूर पश्चिम | ५ | २ | १०१७९०४ | ३९७० | १ |
| | एकूण | २३ | ११ | १७०९५४९ | २८९७३१ | १६ |

(२) उपरोक्त प्रमाणे बदलापूर पूर्व पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या १८ गुन्हयांपैकी ०७ गुन्हयाचे दोषारोपपत्र सादर केले असून सदरचे गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत. तसेच ०५ गुन्हे "अ" फायनल व ०६ गुन्ह्यांचा पोलीस तपास चालू आहे.
बदलापूर पश्चिम पोलीस पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या पाच गुन्हयांपैकी एका गुन्ह्यात दोषारोपपत्र सादर केले असून सदरचा गुन्हा न्यायालयात प्रलंबित आहे व चार गुन्ह्यांचा पोलीस तपास चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आर्थिक दुर्बल घटक व मध्यंम वर्गीयांसाठी झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (एसआरए) आणि शिवशाही पुनर्विकास प्रकल्पाच्या माध्यमातून निधी देण्याबाबत

**(४) ३३९८७ (११-०१-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आर्थिक दुर्बल घटक व मध्यंम वर्गीयांसाठी परवडणारी घरे बांधण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ''पंतप्रधान आवास योजनेला'' गती देण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा), झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (एसआरए) आणि शिवशाही पुनर्विकास प्रकल्पाच्या माध्यमातून निधी उभारण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तिन्ही संस्था किती कोटी रुपये निधी उपलब्ध करुन गुंतवणुक करणार आहे,

(३) असल्यास, किती कालावधीपर्यंत घरकुल उभारणीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे व या अनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाही वा अंमलजबावणीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०३-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या योजनेसाठी राज्यातील ३९२ शहरांमध्ये एकूण १९.४० लक्ष घरकुले बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यापैकी १०,००,३२७ (९,०९,४४७ EWS) घरकुलांना केंद्रीय मान्यता व संनियंत्रण समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे.

तसेच सदरहू योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता शासनाने खालीलप्रमाणे विविध उपाययोजना केल्या आहेत.

• शासकीय जमिनी रूपये १/- प्रती चौ.मी.या नाममात्र दराने वितरीत करणे. (शासन निर्णय दिनांक १९.०९.२०१६)

• आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न घटक गटातील व्यक्तींना / लाभार्थ्यांना वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेसाठी केवळ पहिल्या दस्ताला मुद्रांक शुल्कातून सवलत देण्यात आली असून, रूपये १०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

• मोजणी शुल्कात ५०% सवलत देण्यात आली आहे.

• महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सार्वजनिक भागीदारी करणेबाबत दिनांक ११.०१.२०१८ रोजी आदेश निर्गमित केले आहेत.

• अंमलबजावणी यंत्रणांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करणेबाबत वेळोवेळी सूचना तसेच आढावा बैठकी घेण्यात आल्या आहेत.

---

## उल्हासनगर मधील कायदा व सुव्यवस्था बिघडत असल्याबाबत

**(५) ३४४४८ (०७-०१-२०२२). श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथे एका गर्दुल्ल्याकडून अवघ्या २० रुपयांसाठी गोल मैदान येथे अल्पवयीन मुलीवर बेल्डने हल्ला केला तसेच दोन भावांमध्ये वाद होऊन भावाची हत्या झाल्याने उल्हासनगर शहरामध्ये कायदा व सुव्यस्था बिघडून पोलिसांच्यावतीने कोणतीही कार्यवाही होत नसल्याने अवैध धंदे तातडीन बंद करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरामध्ये गर्दुल्ल्यांकडून काही नागरिकांची हत्या होत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलीस विभागाकडून अवैधपणे व्यवसाय, मटका, लॉजिंगमध्ये अनधिकृत व्यवसाय सुरु असणे, गांजा विक्री, चरस यांचा मोठ्या प्रमाणावर विक्री होत असून गांजा पिनारे गर्दुल्ले यांच्यावर लसिफसंबंधित विभागाला माहिती असून तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयाजवळ मटक्याचा अड्डा व विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनसमोर अनधिकृत धंदे सुरु असताना कोणतीही कार्यवाही करीत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलीस स्टेशनसमोर मटक्याचा अड्डा सुरु असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये असतोष निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(५)) असल्यास, उक्त प्रकरणी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि अवैध व्यवसायांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाने व पोलीस विभागाच्यावतीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) उल्हासनगर पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक २१/०५/२०२१ रोजी उसने मागितलेले २० रू दिले नाहीत, यामुळे आरोपीने मयत इसमास चाकूने भोसकुन ठार मारल्याने हिललाईन पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा रजि. नं.१२२/२०२१ दाखल असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

दि.२७/०५/२०२१ रोजी आरोपीने चाकूसारख्या धारदार हत्याराने वार करुन अल्पवयीन मुलीला गंभीर दुखापत केल्याने उल्हासनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. १७०/२०२१ दाखल असून सदर गुन्हयातील विधीसंघर्षीत बालकास ताब्यात घेण्यात आले आहे.

दि.२७/०५/२०२१ रोजी दोन भावांमध्ये खोली वाटणीच्या कारणावरून वाद होऊन भावाची हत्या झाल्याबाबत गुन्हा रजि. नं. १६८/२०२१ दाखल असून आरोपीस अटक करण्यात आली आहे.

उपरोक्त तिन्ही प्रकरणात मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहेत.

(२) व (३) हे खरे नाही.

उल्हासनगर विभागातील पोलीस स्टेशन हद्दीत सतर्क पेट्रोलिंग नेमून गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन मटका, जुगार, अनैतिक व्यापार, गुटखा विक्री व अंमली पदार्थ यासारखे अवैध धंदे चालू असलेबाबत माहिती मिळविण्यात येवून त्याबाबत खातरजमा करुन छापे घालून संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात आलेली आहे.

सहायक पोलीस आयुक्त, उल्हासनगर विभाग कार्यालय, जवळपास असलेले सरस्वती नगर झोपडपट्टी, कमला अपार्टमेंट जवळ, पवई चौक, उल्हासनगर येथे दि.२२/०५/२०२१ रोजी मटका जुगार सुरु असल्याची माहिती मिळाल्याने सदर ठिकाणी छापा घालून संबंधितांविरुद्ध मध्यवर्ती पोलीस स्टेशन गु.र.क्र. १३३/२०२१ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम १८८७ चे कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. सदर गुन्ह्यात एका आरोपीस अटक करण्यात आली असून त्यांचेकडून रु.१७२२०/- इतक्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करणेत आले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) उल्हासनगर विभागातील पोलीस स्टेशन हद्दीत सतर्क पेट्रोलिंग नेमून गुप्त बातमीदारांमार्फत माहिती प्राप्त करुन मटका, जुगार, अनैतिक व्यापार, गुटखा विक्री व अंमली पदार्थ यासारखे अवैध धंदे चालू असलेबाबत माहिती मिळविण्यात येवून त्याबाबत खातरजमा करुन छापे घालून संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात येते.

सन २०२१ मध्ये उल्हासनगर विभागात अवैध धंद्या विरुद्ध १०० गुन्हे दाखल असून २५२ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

---

## मौजे बोरज (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे तौक्ते चक्रीवादळात विदयुत वाहिनी अंगावर पडून वृध्द दांपत्याच्या झालेल्या मृत्यू

**(६) ३५०३० (१२-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे बोरज (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथे तौक्ते चक्रीवादळामध्ये ३३ केव्हीची विदयुत वाहिनी अंगावर पडून दिनांक १६ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास एका दांपत्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ३३ केव्ही विदयुत वाहिनीला संरक्षक तार (गार्डींग वायर) नसल्याने ही दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषींवर कारवाई करुन मृत्यु झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१) होय.
दि. १७.०५.२०२१ रोजी मु. पो. बोरज अंगणवाडी, ता. खेड, जि. रत्नागिरी येथे ३३ केव्हीची विद्युत वाहिनी अंगावर पडून श्री. प्रकाश गोपाळराव घोसाळकर व श्रीमती वंदना प्रकाश घोसाळकर या दांपत्याचा मृत्यू झाला.
(२) हे अंशत: खरे आहे.
दि.१७.०५.२०२१ रोजी तौक्ते चक्रीवादळामुळे खेड तालुक्यामध्ये सर्वत्र वादळी वाऱ्याचा मुसळधार पाऊस कोसळत होता. तौक्ते चक्र वादळातील नैसर्गिक आपत्तीमुळे ३३ के.व्ही. वीज वाहिनी तुटून हा अपघात झाला.
(३) व (४) सदर घटनेची चौकशी विद्युत निरीक्षक कार्यालय, रत्नागिरी यांच्या मार्फत करण्यात आली. विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांच्या अहवालानुसार सदर घटनेस महावितरण जबाबदार असल्याने महावितरण मार्फत मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रति मृत व्यक्तीस रुपये ४,००,०००/- प्रमाणे एकूण रुपये ८,००,०००/- (दोन मृत व्यक्ती) आर्थिक मदत दि.२५.०५.२०२१ रोजी देण्यात आली.
सदर घटना ही नैसर्गिक आपत्तीमुळे घडली असल्यामुळे कोणावरही कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील होमगार्ड कर्मचारी संघटनेच्या मागण्यांबाबत

**(७) ३५५६८ (०७-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गृह विभागात काम करणाऱ्या होमगार्ड कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमगार्ड कर्मचाऱ्यांना ३६५ दिवस काम मिळण्याबाबतची मागणी होमगार्ड कर्मचारी संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०१-२०२३) :** (१), (२) व (३) राज्यातील होमगार्डच्या विविध समस्यांबाबत दि.१०.०१.२०२२ रोजी तत्कालिन मा.उप मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्यातील होमगार्डना वर्षातून १८० दिवस काम देण्याबाबत मान्यता देण्यात आलि आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडवणी (जि.बीड) तालुक्यातील साळींबा ठिंबक उपसा सिंचन योजनेच्या प्रस्तावास मान्यता मिळण्याबाबत

**(८) ३८६७८ (११-०४-२०२२). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तालुका वडवणी (जि.बीड) येथील साळींबा ठिंबक उपसा सिंचन योजना हाती घेण्यास तत्वत: मान्यता देणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने दिनांक १५.११.२०२१ रोजी वा त्यासुमारास मा.मंत्री (जलसंपदा) यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगानें उक्त प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) साळींबा ठिबक उपसा सिंचन योजना ता. वडवणी जि. बीड माजलगाव धरणाचे बाष्पीभवन मधील बचतीमधून तत्वत: मान्यतेचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र क्र. जा. क्र. ४४०७ दि. ०९.०५.२०२२ अन्वये शासनास प्राप्त झाला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासन पत्र दि.२१/०९/२०२२ अन्वये इतर पर्यायानुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश महामंडळास देण्यात आले. त्यानुसार आवश्यक सर्वेक्षणाचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राबोडी (जि.ठाणे) येथील एका व्यक्तीची हत्त्या झाल्याबाबत

**(९) ४०६४४ (०७-०४-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राबोडी (जि.ठाणे) येथील एका व्यक्तीची हत्त्या प्रकरणातील आरोपींना पकडण्यात स्थानिक पोलीसांना अपयश आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी अनेक महिने होऊनही त्यातील काही आरोपींना पकडण्यात स्थानिक पोलीस असमर्थ दिसल्याने संबंधीत आरोपींचा शोध घेण्यासाठी केंद्रीय तपास यंत्रणेकडे हे प्रकरण वर्ग करण्याची मयत व्यक्ती यांच्या कुटुंबांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच तपासाला गती मिळण्याची मागणी करणाऱ्या मयत व्यक्तीच्या कुटूबियांवर स्थानिक पोलीस यंत्रणेकडून गुन्हा दाखल करण्याची कारवाई करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू कारवाईमुळे मयत व्यक्ती यांच्या पत्नी व मुले मानसिक दबावाखाली वावरत असल्याची तक्रार मुख्यमंत्री व गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय निष्पन्न झाले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) राबोडी (जि.ठाणे) येथील जमील शेख यांची हत्या झाल्याने राबोडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.क्र.४९७/२०२० गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर प्रकरणी २ आरोपींना अटक करण्यात आली असून १ पाहिजे असलेल्या आरोपीचा शोध चालू आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, राबोडी (जि.ठाणे) येथील जमील शेख यांची हत्येतील मुख्य आरोपी पकडण्याकरिता सक्षम यंत्रणेची नियुक्ती करण्याबाबतचे निवेदन मा. विधानसभा सदस्यांनी दि.१९/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा. राज्यपाल महोदयांकडे दिले होते.
(३) हे खरे नाही, परंतू मयत यांचे कुटुबियांनी संशयित आरोपीस अटक व्हावी, म्हणून दि.०४/०४/२०२१ रोजी आरोपीचे कार्यालय व ॲम्ब्युलन्स यांची लाठ्या, काठ्या दगड व इतर वस्तूने तोडफोड करुन शिवीगाळ व धमकी दिली म्हणून राबोडी पोलीस ठाणे, गु.र.क्र. ७४/२०२१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
तसेच कोविड-१९ नियमांचे व पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्राच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने ठाणेनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१९२/२०२१ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) हे खरे नाही. तथापि, मयत यांची पत्नी श्रीमती खुशनुमा जमील शेख, यांनी दि. २५/०२/२०२२ रोजी १)मा.मुख्यमंत्री, २) मा. केंद्रीय गृहमंत्री, ३) मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम ४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना संशयित आरोपीस अटक करण्याबाबतचे निवेदन दिले होते.
(५) मयत यांचे कुटूंबाच्या तक्रारी अर्जाचे व दाखल गुन्हयाचे अनुषंगाने फिर्यादी व अर्जदार यांना विश्वासात घेऊन व सातत्याने त्यांच्या संपर्कात राहून गुन्हयाचा तपास चालू असून गुन्हयातील पाहिजे आरोपी उसामा शेख याचा शोध घेण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दहिसर (मुंबई) येथे भारतीय चलनाच्या बनावट नोटा छापून वितरित करण्याच्या प्रयत्नात असलेल्या आंतरराज्यीय टोळीबाबत**

**(१०) ४०७२१ (१२-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर (मुंबई) येथे भारतीय चलनाच्या बनावट नोटा छापून वितरित करण्याच्या प्रयत्नात असलेली आंतरराज्यीय टोळीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दिनांक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास अटक केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी किती जणांना अटक करण्यात आले असून त्यांची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर टोळीकडून किती रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या आहेत तसेच सदर प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१), (२) व (३) होय. दहिसर (मुंबई) येथे भारतीय चलनाच्या बनावट नोटा छापून वितरित करण्याच्या प्रयत्नात असलेली टोळी आढळून आल्याने दहिसर पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ८८/२२ भा.दं.वि.सं. कलम ४८९ (अ) (ब), (क), १२० ब, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा पुढील तपासासाठी गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हा अन्वेषण विभाग, मुंबई यांच्याकडे वर्ग करण्यात आला असून त्याचा गु.र.क्र. ०६/२२, असा आहे.
सदर गुन्ह्यात एकूण सात जणांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी करण्यात आलेली आहे.
सदर टोळीकडून भारतीय चलनातील दोन हजार रुपयाच्या एकूण सात कोटी रुपये इतक्या रक्कमेच्या नोटा हस्तगत करण्यात आल्या आहेत. सदर प्रकणात संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वर्सोवा (मुंबई) येथील विकास नगर टँक प्लॉट येथे अवैध कचरा (डंपिंग), मुलींची छेडछाड तसेच होत असलेले अनैतिक गैरप्रकाराबाबत**

**(११) ४०७२२ (१२-०४-२०२२). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्सोवा (मुंबई) येथील विकास नगर टँक प्लॉट येथे मोठ्या प्रमाणावर अवैध कचरा (डपिंग) तसेच बेकायदेशीर गाड्या उभ्या राहत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अवैध डपिंग, कचरा व घाणीच्या साम्राज्यामुळे तेथील स्थानिकांना रोगराई तसेच ये-जा करताना अनेक गैरसोईंना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अवैध डपिंग तसेच तेथे उभ्या करण्यात येत असलेल्या बेकायदेशीर पार्कींग गाड्यांमध्ये तसेच तेथील जुन्या दोन मजली पडीक इमारतीत गर्दुल्ले, दारुडे दारु पिऊन मुलींची छेडछाड तसेच ड्रग्स सारखे अनैतिक गैरप्रकार राजरोसपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी तेथील स्थानिक लोकप्रतिनीधी व अनेक सामाजिक संस्थांनी महानगरपालिका तसेच तेथील पोलिस ठाण्यामध्ये तक्रारी करुनही कोणती कारवाई करण्यात आल्याचे दिसून येत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) व (२) विकासनगर टँक प्लॉट हा क्रिडांगणासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. मैदानाच्या पुर्वेकडील बाजुस तत्कालीन नगरसेवक श्री. राजु पेडणेकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका फंडातून इनडोअर गेमसाठी बांधकाम केलेले होते. सदरचे बांधकाम तळ मजला अधिक दोन माळे या प्रमाणे असून, सदरचे काम अर्धवट झालेले आहे. सदर मैदानाचे सर्व बाजूने रहिवासी वस्ती असून, सदर मैदानाची संरक्षक भिंत काही ठिकाणी तुटलेली असल्यामुळे बाजूचे रहिवाशी त्यांची न वापरातले सामान ठेवणे व वाहन पार्किंगसाठी मैदानाचा वापर करतात तसेच संरक्षक भिंतीच्या पुर्वेकडील बाजूस रहिवासी कचरा टाकत होते.
(३) नाही.
(४) व (५) मा. आमदार डॉ. श्रीमती भारतीताई लव्हेकर यांनी सदर ठिकाणास भेट दिल्यानंतर बृहन्मुंबई महानगर पालीकेचे अधिकारी / कर्मचारी व ओशिवरा पोलीस ठाणे, मुंबई यांच्या अधिकाऱ्यांनी भेट देवून त्या ठिकाणी लोकांनी टाकलेला कचऱ्याची विल्हेवाट लावलेली आहे. तद्नंतर सदर मैदानामध्ये बांधलेल्या कच्च्या झोपडयांचे निष्कासन केलेले आहे.

स्थानिक रहिवासी त्यांचे वापरते वाहन तसेच त्या ठिकाणची बऱ्याच दिवसापासून वापरात नसलेली वाहने हटविण्याकरीता कार्यवाही करण्यात येत आहे.

नशा करणाऱ्यांविरूध्द पोलीसांनी वेळोवेळी कायदेशीर कारवाई केलेल्या आहेत. तसेच सदर ठिकाणी महिलांची छेडछाड होणार नाही. त्याचप्रमाणे गर्दुले जाणार नाहीत याची दक्षता पोलीसांनी घेतली असून, त्या ठिकाणी गस्त वाढविण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील वाहतूकीच्या नियमनाबाबत

**(१२) ४०७८२ (२०-०४-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना शहर वाहतूक पोलिसांकडून मात्र वाहतूक नियमनाकडे पूर्णत: दुर्लक्ष केले जात असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाहतूक पोलिस कर्मचारी मुख्य चौकात आणि रस्त्यांवर आडोशाला थांबून केवळ दंडात्मक कारवाईत व्यस्त असून, वाहतूक नियंत्रणासाठी कोणतेही प्रयत्न करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे शहरातील वाहतुकीचा गंभीर होत असलेला प्रश्न सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) वाहन चालक प्रलंबित दंडाची रक्कम मुदतीत भरणा करीत नसल्यामुळे नाकाबंदीकामी वाहतूक पोलीस कर्मचारी एकत्र येतात. तसेच वाहतूक नियंत्रणासाठीही वेळोवेळी आवश्यक कार्यवाही करण्यात येते.
(३) पुणे शहरातील वाहतूक प्रश्न सोडविण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.

अ) पुणे स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत शहरातील चौकात ATMS (Adaptive Traffic Management System) अनुरूप सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात येत आहे.

ब) नागरिकांना वाहतूक नियम व वाहतूक कोंडीबाबत सुचना देण्यासाठी ठिकठिकाणी डिजीटल डिस्प्ले लावण्यात आले आहेत.

क) शहरात वाहतुकीस अडथळा ठरणारी बेवारस वाहने पुणे महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी हलविली जातात, त्यामुळे वाहतूक सुरळीत होते.

ड) विविध ठिकाणी कॅमेरांद्वारे वाहतूक कोंडीवर निगराणी ठेवून वाहतूक कोंडी झालेल्या ठिकाणी वेळीच वाहतूक अंमलदार पाठवून ती दूर केली जाते.

च) शहरात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बीआरटी मार्ग तयार केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ज्येष्ठ नागरिकांना पोलिस विभागांमध्ये प्राधान्याने न्याय मिळवून देण्याबाबत

**(१३) ४०८८२ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासन गृह खात्यातील मुंबई पोलिस आयुक्तालय व ठाणे पोलिस आयुक्तालय यांच्याकडे गेल्या दोन महिन्यापासून ज्येष्ठ नागरिक जमिन मिळकतीचे खोटे बनावट कागदपत्र बनविल्याचे बनावट सही करुन गैरअर्जदाराने भागीदारी रद्द केल्याचे अर्जदार ज्येष्ठ नागरिक उदय कुमार सिंग यांचे मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या पोलिस आयुक्त, सह पोलिस आयुक्त (गुन्हे) व सहपोलिस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांना दिनांक १ ऑक्टोबर, २०२१ रोजी व दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे आयुक्त कार्यालय व मीरा-भाईदर पोलिस आयुक्त कार्यालयातील पोलिस आयुक्त व पोलिस उपायुक्त गुन्हे यांना दिनांक २५ डिसेंबर, २०२१ व दिनांक ७ डिसेंबर, २०२१ व दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी ज्येष्ठ नागरिक पुरुषोत्तम पटेल व सॅण्ड्रा ऑगस्टीन यांनी गैरअर्जदार आरोपीने ठार मारण्याची धमकी दिल्याचे व बनावट कागदपत्र तयार करुन त्यांची जमिन व गाळा कब्जा केल्याबाबत तक्रार देऊनही ज्येष्ठ नागरिक उदयकुमार सिंग, पुरुषोत्तम पटेल व सॅण्ड्रा ऑगस्टीन व भिवंडी-नारपोली पोलीस स्टेशन हद्दीतील कनकीबाई हेंदर म्हात्रे यांनी पोलिस उपायुक्त भिवंडी यांना दिलेले अर्ज या चौघांना पोलिस विभागाकडून सतत हेलपाटे लावून वाईट वागणूक मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वाईट वागणूकीमुळे त्यांच्या कमजोरीचा गैरफायदा घेऊन गैरअर्जदार आरोपी यांच्याबरोबर पोलिस विभागांचे संगनमत झाले की काय असे संशय तेथील सर्व ज्येष्ठ नागरिकांमध्ये बळावला असून ज्येष्ठ नागरिकांमध्ये पोलिस संरक्षणाची भावना संपुष्टात आल्याने त्यांचा कायदा व सुव्यवस्थेवरुन विश्वास गेल्याचे तक्रार पोलिस विभागाला दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ज्येष्ठ नागरिक यांच्या सुरक्षेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने शासनाच्या पोलिस विभागाने संबंधित अधिका-यांनी जेष्ठ नागरिकांच्या तक्रारी अर्जावरुन कित्येक महिने हेलपाटे मारावयास लावणाऱ्या अधिका-यांविरुध्द शासनाकडून गंभीर दखल घेऊन त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची व बडतर्फीची कारवाई करण्याची शासनाची भूमिका काय आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी ज्येष्ठ नागरिकांना पोलिस विभागांमध्ये प्राधान्याने न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) होय,

जेष्ठ नागरिक उदय कुमार सिंग यांनी सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांचेकडे दि.२३/०९/२०२१ रोजी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांनी सविस्तर चौकशी करून अर्जदार व विरोधक यांचे जबाब नोंद केले, त्याचप्रमाणे संबंधित विभागाकडून पुराव्यासंबंधित कागदपत्र प्राप्त करून घेण्यात आले असून पुढील कार्यवाही चालू आहे. तथापि, श्री. सिंग यांचा ठाणे पोलीस आयुक्तालयास अर्ज प्राप्त नाही.

(२) व (३) हे खरे नाही. विषयांकीत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

i) पुरुषोत्तम पटेल यांनी नारपोली पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दाखल तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितांना नारपोली पोलीस स्टेशनला बोलावून त्यांचे सविस्तर जबाब नोंदविले आहेत. श्री. पटेल यांनी त्यांच्या मालकीचा गाळा श्री. अहिरे यांना सन १९९२ मध्ये ताब्यात दिला असून तो आज पर्यंत त्यांच्याच ताब्यात आहे. तसेच श्री. अहिरे यांनी गाळयाच्या मालकी संदर्भात खोटे कागदपत्र बनविल्याचे चौकशी मध्ये दिसून आले नाही. तरी त्यांच्यामध्ये भांडण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, म्हणून हे प्रकरण विशेष कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे सी.आर.पी.सी. मधील कलम १४५ प्रमाणे पाठविण्यात आले असून ते न्यायप्रविष्ट आहे.

ii) सॅण्ड्रा ऑगस्टीन यांनी तक्रारी अर्ज केला नसून त्यांचे मार्फतीने कुलमुखत्यारपत्रधारक श्री.नागेश किसनराव निमकर यांनी तक्रार अर्ज केला असून तो उत्तन सागरी पोलीस ठाणे, मिरा-भाईंदर येथे प्राप्त आहे. त्याअनुषंगाने श्री. निमकर यांचा जबाब नोंद केला असून त्यामध्ये त्यांनी संबंधित जमिनीबाबत अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांचेकडे सुनावणी होऊन सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर सॅण्ड्रा ऑगस्टीन अल्मेडा व ऑगस्टीन जोजफ अल्मेडा यांची नावे लागल्याने त्यांची कोणाविरुद्ध काही तक्रार नसल्याचे नमूद केले आहे. त्याप्रमाणे त्यांचा जबाब नोंद केला इसून त्यांचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करत असल्याबाबत सूचनापत्र दिले आहे.

iii) कनकीबाई हेंदर म्हात्रे यांनी अरूण सुकुर पाटील व इतर ११ यांचे विरूध्द तक्रार अर्ज दिला असून त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालयात दावा क्र.१८४९/२०१२ हा दाखल असून तो प्रलंबित आहे. सदर अर्जामधील नमूद संबंधितांना नारपोली पोलीस ठाणे, ठाणे येथे बोलावून त्यांचेकडे या अर्जाच्या अनुषंगाने चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत.

तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, म्हणून संबंधितांना सी.आर.पी.सी. मधील १४९ प्रमाणे नोटीस अदा करण्यात आली आहे. तसेच सदरची बाब ही दिवाणी स्वरूपाची असून मा.न्यायालयात दावा प्रलंबित असल्याने सदरचा अर्ज दिनांक १०/०५/२०२२ रोजी दप्तरी फाईल करण्यात आला आहे.

(४) तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारच्या कामात कुचराई केले बाबत आढळून आले नसल्याने त्यांचे विरुद्ध शिस्तभंगाची व बडतर्फाची कारवाई करण्यात आली नाही.

(५) जेष्ठ नागरिकांना पोलीस विभागामार्फत न्याय मिळवून देण्याकरिता पुढील उपाययोजना करण्यात येतात:-

१. प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ज्येष्ठ नागरिक सुरक्षा समिती स्थापना करण्यात आलेली आहे.

२. बिट अधिकारी / कर्मचारी हे आपआपल्या हद्दीतील ज्येष्ठ नागरिकांची प्रकृतीविषयक व इतर अडचणी विषयी माहिती घेण्यासाठी प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन भेटी देत असतात.

३. जेष्ठ नागरिकांच्या तक्रारीचे किंवा समस्यांचे पोलीस तत्परतेने निवारण करतात.

४. ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेतेसाठी काय करावे किंवा काय करु नये, याबाबत व्यापक प्रसिध्दी केली जाते.

५. जेष्ठ नागरिकांच्या विनंतीवरुन त्यांच्याकडे कामे करणाऱ्या व्यक्तींची पूर्व चारित्र्य पडताळणी केली जाते.

६. ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारीसाठी हेल्पलाईन सुरु करण्यात आली आहे.

७. स्थानिक पातळीवर बैठकांचे आयोजन केले जाते.

८. ज्येष्ठ नागरीकांच्या बाबतीत घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांमध्ये त्यांचे नातेवाईक किंवा नोकरांकडून झालेले असतात तेव्हा वृध्द नागरीकांना नोकर ठेवतांना त्या विभागातील पोलीस ठाणे मध्ये त्या नोकरांची माहिती देण्यास (फोटो व हाताचे ठसे) सूचित करण्यात आले आहे.

९. ज्येष्ठ नागरीकांच्या इच्छे विरुध्द खरेदीखत करुन घेण्यासारख्या प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्या संदर्भात त्वरीत दखलपात्र फौजदारी गुन्हे दाखल करणेबाबत कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) पोलिस स्टेशन हद्दीत ऋषि फॉर्म हाऊसच्या स्विंमिग पुलमध्ये एका व्यक्तीचा संशयित मृत्यू झाल्याबाबत

**(१४) ४०८९२ (१२-०४-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पडघा (ता.भिवंडी, जि.ठाणे) पोलिस स्टेशन हद्दीत ऋषि फॉर्म हाऊसच्या स्विंमिग पूलमध्ये एका अल्पवयीन मुलाचे दिनांक १३ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास संशयित मृत्यू झाला, या अल्पवयीन मुलाची उंची ५.४ इंच होती तर स्विमिंग पूलाची खुली ४.८ फूट पर्यंत होती, असे असतांना सदर मृत्यूला संबंधित पोलिस अधिका-यांनी कोणत्या तरी दबावाखाली येऊन आकस्मिक मृत्यूंची नोंद केली कारण फार्म हाऊसवरती अनेक असे १५ तरुण त्या ठिकाणी होते, कोणाच्या तरी दबावाखाली पोलिस अधिकारी येऊन १५ तरुणांची चौकशी न करता त्यांना तत्काळ सोडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच त्यांच्या मोबाईल नंबरवरुन कॉल डिटेल, व्हॉईस रेकॉर्डिंग, व्हाटॅसअप चॅटिंग व व्हिडीओ कॉल्स आदि कुठलाही तपास न करता तपास बंद करण्यात आला, संबंधित पोलिस अधिका-यांनी कोणाच्या तरी दबावाखाली त्या व्यक्तीची हत्या झाली असून याला पोलिस विभागाने वेगळे स्वरुप दिलेले आहे व प्रकरण दाबून टाकण्यात आलेले असल्याने त्याची हत्या झाल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणामध्ये अनेक वेळा संशयितांचे दूरध्वनी क्रमांकाचे कॉल तपशील, व्हॉट्सअप चॅटबाबत पोलिस विभागाने दिरंगाई केल्याने व कुठलाही तपास व्यवस्थित न केल्याने संबंधित पोलिस अधिका-यांवरती आरोपींना मदत करण्याचा संशय निर्माण होत असल्याने त्यांना बडतर्फ करुन शासन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाबाबत विद्यार्थ्यांच्या कुंटुंबास न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०१-२०२३) :** (१) हे खरे नाही. कु.अजय मन्नु शर्मा हा कांदळी गावचे हद्दीतील ऋषी फार्महाऊस त्याच्या मित्रांसोबत वाढदिवसाची पार्टी करण्याकरिता गेला होता. तेथील स्विमींग पुलामध्ये बुडून त्याचा मृत्यू झाला आहे.

सदर प्रकरणात ठाणे ग्रामीण जिल्ह्यातील पडघा पोलीस ठाण्यामध्ये सदर घटनेबाबत अपघात मृत्यु रजिस्टार क्र. ४७/२०२० सी.आर.पी.सी. कलम १७४ प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरची चौकशी ही तत्कालिन उप विभागीय पोलीस अधिकारी, गणेशपुरी विभाग यांनी केली असून अकस्मात मृत्युचे अनुषंगाने यातील १५ मुलांचा तसेच फार्मचे मॅनेजरचा जबाब घेऊन सदर मयत मुलाच्या आईवडिलांसोबत चौकशी करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.१८/०१/२०२१ रोजी मयत मुलाच्या वडिलांनी तक्रार अर्ज दिला होता.

सदर प्रकरणात मयताचे सोबत असणाऱ्या १५ मुलांच्या मोबाईल नंबरवरुन कॉल डिटेल्स व व्हॉईस रेकॉडींग प्राप्त करुन त्या अनुषंगाने तपास केला असता मयत अजय शर्मा यांच्या मरणाबाबत काहीएक उपयुक्त माहिती मिळून आली नाही.

तसेच मयत नामे कु. अजय मन्नु शर्मा याचे वैद्यकीय अधिकारी, सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे शव विच्छेदन केले असून त्यांनी मयत याचा पाण्यात बुडून मृत्यू आल्याबाबत नमूद केले असून वैद्यकीय अधिकारी, सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे यांनी मयताचा राखून ठेवलेला व्हिसेरा रासायनिक विश्लेषणाकरिता उप संचालक, लघु न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, ठाणे येथे पाठविण्यात आलेला असून, या प्रकरणात कोणतीही दिरंगाई करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वानगांव (जि.पालघर) येथील पोलीस ठाण्यामध्ये शेतक-यांचे पैसे थकविल्याबाबत

**(१५) ४१६४८ (१२-०४-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानगांव (जि.पालघर) येथील पोलीस ठाण्यामध्ये शेतकऱ्यांचे पैसे थकविल्याप्रकरणी व्यापाऱ्यां विरोधात शेतकरी बांधवांनी दिनांक १४ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार शेतकऱ्यांचे पैसे थकविल्याप्रकरणी दोषी आढळणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) होय, श्री. उदय पांडुरंग राऊत व इतर शेतकरी यांचे वाणगांव येथील व्यापारी पैसे वेळेवर न देता थकीत रक्कम देण्यात टाळाटाळ करत असल्याने या विषयात लक्ष घालून न्याय द्यावा, असा अर्ज दिनांक १४/०६/२०२१ रोजी वाणगांव पोलीस ठाणे, जि. पालघर येथे प्राप्त झाला आहे.

(२) सदर अर्जाच्या अनुषंगाने अर्जदार शेतकरी व गैरअर्जदार व्यापारी यांची दिनांक २६/०७/२०२१ रोजी प्रभारी अधिकारी यांनी वाणगांव पोलीस ठाण्यात एकत्रित बैठक घेतली होती. सदर वेळी अर्जदार शेतकरी यांनी गैरअर्जदार व्यापारी यांना उधारीवर शिमला मिरची विकत दिल्याने त्याचे पैसे गैरअर्जदार व्यापारी यांनी दिलेले नाहीत. अर्जदार शेतकरी व गैरअर्जदार व्यापारी यांचेत आपसात समझोता होऊन गैरअर्जदार व्यापारी यांनी माहे सप्टेंबर २०२१ अखेर पर्यंत अर्जदार शेतकरी यांची थकीत रक्कम देण्याचे ठरवून गैरअर्जदार व्यापारी यांनी दिनांक ३० सप्टेंबर २०२१ पर्यंत अर्जदार शेतकऱ्यांचे पैसे न दिल्यास अर्जदार शेतकरी हे पुन्हा त्यांचेविरुध्द तक्रार अर्ज करणार असल्याचे ठरले होते. सदर वेळी अर्जदार शेतकरी यांनी दिलेला तक्रारी अर्ज पोलीस ठाणे स्तरावर फाईल करण्याबाबत अर्जदार शेतकरी यांनी सांगितले असुन अर्जदारांच्या विनंतीवरुन तक्रारी अर्ज दप्तरी फाईल करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील लघु व्यवहारात सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक

**(१६) ४१९६० (१२-०४-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लघु मालमत्तेच्या फसवणूकीच्या अनेक घटना वृत्तपत्र व वृतवाहिन्यांतून निदर्शनास येत असून लघु व्यवहारात फसवणूकीच्या घटनांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विषयाप्रसंगी मुंबई व भिवंडी शहरातून मोठ्या प्रमाणावर लघु व्यवहारात फसवणूक होऊन किंमत पाच लाख रुपये असल्यास, त्या घराची विक्री तीन लाखांत होऊन तीन लोकांना विक्री करुन घराची आगाऊ रक्कम (डिपोझिट) घेतल्यामुळे घराचे तीन कागदपत्रे तयार होतात, भिशी, लकी ड्रॉ.फंड असे मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार होत असून याप्रकरणी पोलिस प्रशासनामार्फत कोणत्याही प्रकारची तक्रार नोंदवली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर राज्यातील लघु व्यवहारातील सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक प्रकरणी धोरण निश्चित तसेच चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, यांना निवेदन सादर केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त निवेदनाच्या अनुषंगाने नागरिकांना न्याय मिळेल या उद्देशाने याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) व (२) लघु व्यववहारात आर्थिक गैरव्यवहाराच्या फसवणुकीबाबत ठाणे आयुक्तालयामध्ये परिमंडळ-३ च्या कल्याण हद्दीतील पोलीस ठाण्यात दाखल झालेले दोन गुन्हे पुढीलप्रमाणे आहेत:-

मानपाडा पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र.क्र. १५०/२०२१ भा.दं.वि.सं. कलम ४०६, ४२०, ५०४, ५०६, ४६५, ४६७, ४६८, ४७१ सह मोफा कलम ३, ५, १०, ११, १३ प्रमाणे गुन्हा दाखल असून निष्पन्न झालेल्या एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी विरुद्ध मा. न्यायालयात दिनांक १३/०५/२०२१ रोजी दोषारोप पत्र दाखल केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट असून आरोपीवर सी.आर.पी.सी. १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे .

महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, ठाणे गु.र.क्र. १३७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४०६ सह एम.पी.आय.डी. अधिनियम १९९९ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल असून निष्पन्न झालेल्या एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) राज्यात लघु व्यवहारातील सामान्य नागरिकांची होणारी फसवणूक प्रकरणी धोरण निश्चित तसेच चौकशी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास गृहमंत्री, महाराष्ट्र यांना निवेदन सादर केले असल्याची बाब निदर्शनास आलेले नाही.

(४) लघु व्यवहारातील सामान्य नागरीकांची होणाऱ्या फसवणूकीबाबत पोलीस प्रशासनास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### शहापूर येथे कर्म संस्थेच्या माध्यमातून शेतकरी व महिलांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत

**(१७) ४३५४२ (१२-०४-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर येथे कर्म संस्थेच्या माध्यमातून आदिवासी, आर्थिक दुर्बल घटक व महिलांकरीता सुरु असलेले कार्य बंद करुन शेतकरी व महिलांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबत एका व्यक्तीविरुध्द उप विभागीय पोलीस अधिकारी, शहापूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले, तद्नुसार दोषींविरुद्ध कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत कर्म संस्था वाशिंद येथील शाखेस निधी मिळत नसल्याने संस्थेची कामे करणे अवघड झाल्याने, संस्थेचे सर्व कर्मचारी व ग्रामस्वयंसेवक तसेच संस्थेचे पदाधिकारी यांनी एकत्र मिटींग घेऊन सदरची कर्म संस्था डहाणू येथे स्थलांतरीत केल्याने कर्म संस्था वाशिंद येथे काम करणारे कर्मचारी, ग्रामस्वयंसेवक यांनी राजीनामे दिलेले होते. तथापि, अर्जदार कर्मचारी सदस्य यांनी कर्म संस्थेचा राजीनामा न दिल्याने व त्यांना संस्थेने दिलेली कामे समाधानकारक नसल्याने कर्म संस्थेमार्फत त्यांना नोटीस देऊन कर्म संस्थेच्या कामावरुन काढण्यात आलेले होते. याचा मनात राग धरुन संस्थेचे पदाधिकारी यांचे विरोधात संस्थेमधील येणाऱ्या देणग्यांच्या पैशांचा गैरवापर केला असल्याचा आरोप करुन सदरचा तक्रारी अर्ज दाखल केलेला असल्याचे चौकशीत निष्पन्न झालेले आहे.

सदर संस्थेविरोधात इतर कर्मचारी, ग्राम स्वयंसेवक, महिला मंडळ तसेच शेतकरी यांच्या कुणाच्याही तक्रारी नसल्याने सदरचा अर्ज फाईल करण्यात आला आहे. याबाबत दि.१९/०४/२०२२ पत्रान्वये अर्जदारास कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण पश्चिम (जि.ठाणे) येथील गांधारी येथे रॉयस डेव्हलपर्स या विकासकाने इमारतीचे बांधकाम अपूर्ण ठेवल्याबाबत**

**(१८) ४४५१४ (२४-०५-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण पश्चिम (जि.ठाणे) येथील आधारवाडी परिसरातील गांधारी येथील रॉयस डेव्हलपर्स या विकासकाने रॉयस पॅराडाईस B-७, या इमारतीचे बांधकाम सन २०१७-१८ मध्ये सुरु करुन ग्राहकांकडून घरांसाठी बुकींग करुन घेतली होती, परंतु सुमारे चार ते पाच वर्षांचा कालावधी होवूनही अद्याप बुकींग केलेल्या ग्राहकांना त्यांचे हक्काचे घर दिलेले नाही, या प्रकरणी अनेकवेळा तक्रारी दाखल करुनही विकासकावर अद्याप कोणतीच कारवाई झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीत बुकींग केलेल्या ग्राहकांनी ९० ते ९५ टक्के रक्कम अदा केली आहे, काही ग्राहकांनी घराची संपुर्ण रक्कम विकासकाला दिलेली आहे, तरीही विकासक ग्राहकांची फसवणूक करीत आहे, याबाबत ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण होऊन त्यांनी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार देऊनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ग्राहकांना त्यांचे हक्काचे घर मिळवून देण्याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) व (२) रॉयस पॅराडाईज, ठाणे प्रकल्पामधील इमारत क्र.बी-७ बाबत बांधकामाच्या मंजूरी सन २०१६ मध्ये कल्याण-डोंबीवली महानगरपालिकेकडून घेण्यात आल्या असून, तेव्हापासून इमारतीचे काम व सदनिका विक्री चालू आहे.

या प्रकल्पातील काही सदनिकाधारकांनी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत खडकपाडा पोलीस ठाणे, कल्याण (प.) येथे रॉयस पॅराडाईज बी / ७ मधील सदनिकांचे हस्तांतराबाबत तक्रार अर्ज सादर केलेला आहे. त्यानुषंगाने, स्थानिक पोलिस ठाणे यांचेकडून विकासकाची चौकशी करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकल्प स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे नोंदणीकृत करतेवेळी विकासकाने प्रकल्प ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत पुर्ण करावयाचे नोंदविले आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने विकासकाला पहिल्यांदा ३१ डिसेंबर २०२० पर्यंत स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम २०१६ मधील कलम ६ नुसार १ वर्षाची मुतदवाढ दिली. तद्नंतर विकासकाने ५१% पेक्षा जास्त ग्राहकांचे सहमती सादर केल्यानंतर स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ मधील कलम ७ (३) नुसार ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत प्रकल्प पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांनी दिलेल्या मुदतीत सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण करून खरेदीदार यांना सदनिकेचा ताबा न दिल्यास विकासकाविरूध्द पुढील कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सायबर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदा नसून अस्तित्वात असलेला कायदाही प्रभावी नसल्याबाबत**

**(१९) ४४६४३ (०६-१०-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सायबर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदा नसून अस्तित्वात असलेला कायदाही प्रभावी नसल्याची खंत मुंबई पोलिस आयुक्त यांनी व्यक्त केली असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असून दिनांक ३० मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिकही जाळयात अडकत असल्यामुळे सायबर गुन्ह्यांसाठी एक विशेष कायदा करण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पोलिस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून गुन्ह्यांचा तपास करण्यात येतो, परंतु सद्य:स्थितीत फक्त ८०० पोलिस निरीक्षक मुंबई पोलिस आयुक्तालयांतर्गत असल्यामुळे गुन्ह्यांचा तपास करण्याचे प्रमाण फारच कमी असल्याचे सन २०२१-२२ या कालावधीत निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात माहिती व तंत्रज्ञान कायद्यातील काही कलमांऐवजी सायबर गुन्ह्यांसाठी स्वतंत्र कायदाच नसल्यामुळे आधुनिक युगात सायबर गुन्ह्यांचे झपाट्याने वाढलेले प्रमाण अल्पावधीत तपास व्हावा म्हणून सायबर गुन्ह्यांसाठी एक स्वतंत्र कायदा करण्यात यावा, अशी मागणी मुंबईच्या पोलिस आयुक्तांनी शासनाकडे केली असल्याचे दिनांक २९ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू गुन्ह्यांचा तपास करण्याकरिता मुंबई पोलिसात तंत्रज्ञानात कुशल असे मनुष्यबळाचा अभाव आहे, तसेच गुन्ह्यांचा तपास करण्यास कोणत्याही दर्जाचा अधिकारी अंमलदार यांच्याकडे देण्याची परवानगी असावी, अशी मागणी होत आहे. हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने सायबर गुन्हे कमी व नवीन कायदा करण्याकरिता कोणत्या उपाययोजना वा कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) यासंदर्भात कोणताही संदर्भ पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त झालेला नाही. तत्कालीन पोलीस आयुक्त, मुंबई यांनी याबाबत वैयक्तिक मत व्यक्त केले होते.
(२) सन २००० मध्ये माहिती तंत्रज्ञान कायदा अस्तित्वात आला. सायबर गुन्हेगार वेगवेगळया नवनवीन तंत्रज्ञ़ानाचा वापर करून नागरीकांना विशेषत: ज्येष्ठ नागरीकांना तंत्रज्ञान अवगत नसल्याने त्याचा फायदा घेऊन सायबर गुन्हे घडत आहेत. गेल्या काही वर्षात सायबर गुन्हयांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. सायबर गुन्ह्यांवर प्रभावी आळा घालण्यासाठी केंद्र शासनाने माहिती तंत्रज्ञान कायदा,२००० अन्वये शिक्षेच्या तरतुदी केल्या आहेत.
(३) हे खरे नाही. मुंबई शहरात सध्या ९२० पोलीस निरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. सन २०२१ व २०२२ मध्ये अनुक्रमे २८८३ व ३९६० गुन्हे दाखल आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही. मुंबई पोलीस दलामध्ये महत्त्वाच्या तसेच संवेदनशील गुन्हयांचा तपास खाजगी सायबर तज्ञांच्या मदतीने केला जातो. सायबर पोलीस ठाण्याचे अधिकारी / कर्मचारी यांना नियमितपणे सायबर तज्ञांद्वारे प्रशिक्षण देऊन अपडेट व अपग्रेड केले जाते. तसेच त्यांना सायबर फॉरेन्सिक टूल्स हाताळण्याचेही प्रशिक्षण दिले जाते. सायबर इंन्वेस्टीगेशन, डिजीटल पुरावे गोळा करणे, एन.सी.सी.आर.पी. (नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टींग पोर्टल) व सायबर सेफ पोर्टल्स हाताळण्याचे प्रशिक्षण मुंबई शहराच्या स्थानिक पोलीस ठाण्यांना देखील देण्यात आले आहे.
(६) यासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाकडून माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० मध्ये दुरूस्ती करण्यासाठी सर्व राज्य शासनाकडून विविध सूचना मागविण्यात आल्या आहेत. याबाबत पोलीस महासंचालक यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

### औरंगाबाद येथे राज्य राखीव पोलीस दलामध्ये नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

**(२०) ४४६४४ (०७-११-२०२२). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथे राज्य राखीव पोलीस दलामध्ये नोकरी लावून देण्यासाठी राहूल धनंजय देशमुख व सुधीर नावाच्या

व्यक्तीने गृहखात्यातून बोलत असल्याचे सांगून नोकरीची आदेशाची प्रत देण्यासाठी नांदेड येथील हिब्बट गावातील तक्रारदार शेतकरी श्री.शंकर मुंढे यांच्याकडून साडे तीन लाख रुपये घेतल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात श्री.शंकर मुंढे यांनी दोन महिन्यापूर्वी मरीन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात तीन व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, अशाप्रकारच्या "जॉब रॅकेट" मध्ये सहभागी असणाऱ्या संबंधितांवर शासनाद्वारे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) श्री. शंकर मुंढे यांनी दि. ३० मार्च, २०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई येथे तीन आरोपींविरूध्द गु. र. क्र. ८०/२०२२, भा. दं.वि. कलम ४२० व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून तीन आरोपीपैंकी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत घेण्यात येणारी अतिरिक्त सुरक्षा ठेव रद्द करण्याबाबत

**(२१) ४४६८३ (२१-०९-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुका (जि.रायगड) व पंढरपूर (जि.सोलापूर) शहरासह राज्यात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत वीज ग्राहकांकडून विद्युत देयकासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारल्यामुळे नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाची भावना निर्माण झाली असल्याचे माहे जून २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्राहकांकडून वीज मिटर घेताना सुरक्षा ठेव घेण्यात येत असुनही दरवर्षी अतिरिक्त सुरक्षा ठेव घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्राहकांकडून वापरलेल्या वीजेची देयके घेऊन अतिरिक्त सुरक्षा ठेव रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार महावितरणव्दारा अधिकाऱ्यांच्या सुरक्षा ठेव रक्कमेच्या मागणीची बिले माहे एप्रिल २०२२ मध्ये जारी करण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात शासकीय व निमशासकीय जमिनींवर वसाहतीचे अतिक्रमण होत असल्याबाबत

**(२२) ४४८६० (३१-१०-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात वाढत्या नागरीकरणामुळे शासकीय तसेच निमशासकीय जमिनींवर वसाहती स्वरूपाचे अतिक्रमणे सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयातील एस.आर.ए. प्रकल्पांचे कामे मंदावले असून वर्षाला ४० हून अधिक प्रकल्पांना मंजुरी देणाऱ्या झो.पु.प्रा., पुणे कार्यालयाकडे मागील ३ वर्षात ९,७,५ या उतरत्या क्रमाने प्रस्ताव दाखल झाल्याचे निदर्शनास येत आहे ,हे खरे आहे काय,

(३) असल्यास, झो.पु.प्रा., पुणे कार्यालयातील प्रलंबित सर्व योजना मार्गी लावण्यासाठी व भविष्यात जास्तीत जास्त पुनर्वसन प्रकल्पांना चालना मिळण्यासाठी झो.पु.प्रा., पुणे क्षेत्र विकास नियंत्रण नियमावली, २०२२ च्या अंतिम मसुद्यातील सुचविण्यात आलेले २५ प्रमुख बदलाच्या अनुषंगाने प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२), (३) व (४) पुणे व पिंपरी चिंचवड शहरामध्ये सदरचे प्रकल्प हे केवळ टी.डी.आर वर अवलंबून आहेत. त्यामुळे टी.डी.आर.चे दर हे आर्थिक दृष्ट्या कमी असल्याने विकासक यांना सदरची योजना पूर्ण करणे शक्य होत नाही. तसेच, कोरोना सारख्या परिस्थितीमध्ये विकासक यांची आर्थिक परिस्थिती बेताची झाल्याने प्राधिकरणाकडे काहीशा प्रमाणात म्हणजेच २ ते ४ या प्रमाणे प्रस्ताव दाखल झाले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे कार्यालयामार्फत सादर करण्यात आलेली झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्राकरिता एकत्रित विकास नियंत्रण नियमावली, २०२० शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. सदरहू नियमावलीस मान्यता देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात वीज मीटरचा निर्माण झालेला तुटवडा

**(२३) ४५१५४ (२२-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात महावितरण कंपनीकडे पुरेसे वीज मीटर उपलब्ध नसल्याने नागरीकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने महावितरण कंपनीने पुणे शहरातील ग्राहकांना मागणीनुसार वीज मीटर पुरविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) परिमंडळास गरजेप्रमाणे मीटरचा पुरवठा करण्यात येतो. पुणे शहराअंतर्गत एप्रिल-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ या ८ महिन्याच्या कालावधीत एकूण १,३०,४०४ मीटर उपलब्ध करुन देण्यात आले असून १,२६,७७९ ग्राहकांना नवीन वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यभरातील वीज ग्राहकांना माहे एप्रिल/ मे २०२२ दरम्यान करावा लागलेला भारनियमनचा सामना

**(२४) ४५१५६ (२१-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीमार्फत राज्यात अडीच ते तीन हजार मेगावॅट विजेचा तुटवडा भासत असल्याने वीज भारनियमन करावे लागत असल्याचे दि.१२ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज भारनियमन काळ नियंत्रणात रहावा यासाठी शासनाने दि.८ एप्रिल,२०२२ रोजीच्या मंत्री मंडळाचे विशेष बैठकीत, खाजगी कंपन्यांकडून वीज घेण्यास मान्यता दिली असल्याचे व त्यानुसार वीज वितरण कंपनीने गुजरात राज्याच्या सीजीपीएल कंपनीकडून ७६० मेगावॅटची वीज खरेदी केली असल्याचेही निदर्शनास आले , हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू कालावधीत राज्यात एकूण किती वीजेची मागणी होती, व प्रत्यक्षात राज्य शासनाने निर्मित किती विजेचा पुरवठा केला व किती वीज रुपये प्रति युनिट दराने खाजगी कंपन्यांकडून खरेदी करुन वीज कमतरता भागवली, तसेच दि.५ एप्रिल,२०२२ रोजी महावितरणेची सर्वोच्च वीज मागणी २४ हजार ६६८ मेगावॅट होती तथापि त्यानंतर ती मागणी कमी होऊन दि.११ एप्रिल,२०२२ रोजी २३ हजार ३६० मेगावॅटपर्यंत म्हणजेच त्या आठवडाभरातील कमाल वीज मागणीपेक्षा १३०० मेगावॅटने कमी झाल्याचे तसेंच खासगी कंपनीकडून ७६० पैंकी ४१५ मेगावॅट वीज पुरवठा सुरु देखील झाल्याचे दि.१३ एप्रिल,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने वीज वितरण कंपनीमार्फत जाहीर केलेली वीज तुटवडयाची आकडेवारी जनतेची व पर्यायाने शासनाचीच दिशाभूल करणारी असल्याचे राज्यातील वीज तज्ज्ञांकडून सांगण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने याप्रकरणी सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार राज्यात वीज भारनियमन लागू न करण्याचेदृष्टीने कोणती कार्यवाही केली अथवा करण्यांत येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
देशात उद्भवलेल्या कोळसा टंचाईमुळे महावितरण कंपनीने करारीत केलेल्या कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत निर्मिती प्रकल्पांमधून माहे एप्रिल २०२२ दरम्यान ६०% ते ७०% इतकीच वीज उपलब्ध होत असल्यामुळे राज्यात वीजेचा तुटवडा निर्माण झाला होता. तसेच, माहे एप्रिल २०२२ व मे २०२२ सूमारास वीजेच्या मागणीतही अचानक वाढ निर्माण झाल्यामुळे वीजेची उपलब्धता व मागणी यांमध्ये तफावत निर्माण झाली होती. परिणामी, विद्युत प्रणालीच्या सुरक्षिततेसाठी माहे एप्रिल २०२२ मध्ये राज्यभार-प्रेषण केंद्राकडून राज्यातील काही वाहिन्यांवर तात्पुरत्या स्वरुपाचे आपतकालीन भारनियमन काही दिवस आवश्यकतेनुसार लागू करण्यात आले होते.
(२) हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
एप्रिल २०२२ मध्ये महावितरणची कमाल मागणी २५१४४ मे. वॅ. एवढी होती. त्यापैकी महावितरणने २४६६८ मे. वॅ. मागणीची पूर्तता केली. महावितरणने एप्रिल २०२२ मध्ये सुमारे ५०० ते २७०० मे. वॅ. इतक्या विजेची खरेदी सरासरी रुपये ८.६४ प्रति युनिट दराने खुल्या बाजारातून केली. तसेच, दिनांक ०५ एप्रिल, २०२२ रोजी महावितरणची सर्वोच्च वीज मागणी २४६६८ मेगावॅट होती ती दिनांक १४ एप्रिल, २०२२ रोजी २५१४४ मेगावॅट पर्यंत पोहोचली होती. तसेच सदर कालावधीत मे. सीजीपीएल या खाजगी कंपनीकडून ७६० पैकी ६२२ ते ७६० मेगावॅट पर्यंत वीज पुरवठा सुरु होता.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राहाता, कोपरगांव, राहुरी व श्रीरामपूर ( जि.अहमदनगर ) तालुक्यांमध्ये महावितरण कंपनीच्या विज वाहिन्या मध्ये शॉर्टसर्किट होऊन ऊस पिक जळून गेल्याबाबत

**(२५) ४५३८१ (२०-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राहाता, कोपरगांव, राहुरी व श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यांमध्ये महावितरण कंपनीच्या वीज वाहिन्यांमुळे शॉर्ट-सर्किट होऊन ३०-४० एकर ऊसाच्या शेतीला आग लागून सुमारे १०० टन ऊस जळून खाक झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार झालेल्या नुकसानीची स्थळ पाहणी व पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करुनही महावितरण कंपनीच्या सहायक अभियंता व कर्मचारी यांचेमार्फत कोणतीही कार्यवाही न झाल्याने शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शॉटसर्कीटमुळे वारंवार होणाऱ्या घटना टाळण्याकरिता, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत आणि दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राहाता, कोपरगांव, राहुरी व श्रीरामपूर या तालुक्यामध्ये सन २०२१-२२ मध्ये ४३ ठिकाणी आग लागल्याची प्रकरणे निर्दशनास आली आहेत. त्यापैकी ४१ ठिकाणी वीजेच्या तारा तुटल्याने किंवा शॉर्ट-सर्किटमुळे लागलेल्या आगीस महावितरण कंपनी जबाबदार असल्याचा विद्युत निरीक्षक कार्यालयाने अहवाल सादर केला आहे. सदर अपघातात अंदाजे ८० एकर इतके क्षेत्र बाधित झाले आहे.
(२) हे खरे नाही.

विद्युत वाहक तारा कालानुरुप जुन्या होत असल्यामुळे तसेच दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या वीज जोडण्यांमुळे विद्युत भार वाढतो, त्यामुळे तारा काही वेळेला खाली लोंबकळतात, तसेच नैसर्गिक आपत्ती (वादळ, वारा, पाऊस, ऊन) दरम्यान तारा तुटून अपघात घडण्याची शक्यता असते. विद्युत अपघाती पीक जळीत प्रकरणाची माहिती प्राप्त झाल्यानंतर त्वरीत स्थळपाहणी करुन पंचनामा केला जातो.सदर पंचनामा तसेच संबंधिताचे जबाब या आधारे विद्युत निरीक्षक त्यांचा अहवाल सदर करतात.

विद्युत निरीक्षकांच्या अपघात अहवालानुसार महावितरण जबाबदार असल्यास कृषी अधिकाऱ्यांचा दाखला व इतर कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर पीक जळीत प्रकरणी महावितरणच्या नियमानुसार नुकसान भरपाई देण्यात येते.
(३) विद्युत निरीक्षक यांच्या अहवालानुसार महावितरणकंपनीमार्फत नुकसान भरपाई प्रस्ताव तयार करण्यात आले असून कृषी अधिकाऱ्याचा दाखला व इतर आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यावर मंजूरी देण्याचे नियोजित आहे.

शार्टसर्किट व आग लागून होणारे अपघात टाळण्याच्या दृष्टीने वीज तारांचे नियमितपणे सर्वेक्षण करुन, अपघात होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय योजना केली जाते. महावितरणच्या प्रतिबंधात्मक निगा व दुरुस्तीच्या (Preventive Maintenance) योजनेमध्ये वीज वाहिन्या देखभाल व दुरुस्तीची कामे नियमितपणे केली जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंधेरी (मुंबई पश्चिम) येथील फर्निचरवाल्यांरोधात डी.एन. नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत

**(२६) ४५४१७ (०१-११-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (मुंबई पश्चिम) येथील दिव्यांग अब्दुल सत्तार इस्माईल हैबत (५७) यांनी मिलेनियर रिॲल्टीचे भागीदार आसिफ फर्निचरवाला, सिराज फर्निचरवाला व अफजल फर्निचरवाला यांच्याविरोधात डी.एन. नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने संबंधितांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, याप्रकरणी दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१), (२) व (३) डी. एन. नगर पोलीस ठाणे, मुंबई येथे दि. २३/०४/२०२२ रोजी प्राप्त फिर्यादीनुसार गु.र.क्र.२६०/२०२२, भा.दं.वि. कलम ४२०,४६८, ४६७, ४७१, १२० (ब), ५०६, ३४ अन्वये तीन आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपींविरूध्द सबळ पुरावा प्राप्त करून दिनांक ०७/०९/२०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोप सादर करण्यात आले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक शहरात बंद गाड्यांमध्ये मानवी अवयव सापडल्याबाबत

**(२७) ४५४५० (३१-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील मुंबई नाका पोलीस ठाण्यापासून जवळच्या अंतरावर बंद गाड्यांत मानवी अवयव आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे मानवी अवयवांच्या तस्करीबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :**(१), (२) व (३) नाशिक शहरातील मुंबई नाका ते सारडा सर्कलकडे जाणाऱ्या रोडवर असलेल्या बंद गाळ्यात दिनांक २७.३.२०२२ रोजी मानवी देहाचे डोक्याचे कट केलेले तुकडे केमिकलमध्ये साठवलेले आढळून आले होते.
संबंधित डॉक्टर यांनी सदर मानवी अवयव वैद्यकिय अभ्यासाकरीता शारिरीक नमूने म्हणून नानावटी हॉस्पिटल, मुंबई येथून कायदेशीररित्या प्राप्त करुन घेतल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.
सदर प्रकरणात मानवी अवयवांची तस्करी झालेली नाही.
(४) विलंब झालेला नाही.

---

## नाशिक शहरातील पोलिस विभाग लाचखोरीत अग्रगण्य असल्याबाबत

**(२८) ४५४५७ (३१-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातील पोलिस विभाग लाचखोरीत अग्रगण्य असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाई करताना दिनांक ३ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात पोलिस दलातील लाचखोरी कमी करण्यासाठी पोलिस आयुक्त स्तरावर तसेच शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
दि.०१/०१/२०२२ ते दि.०३/०४/२०२२ रोजी पावेतो नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी अगर अंमलदार यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक अंतर्गत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हे दाखल नाहीत. परंतु माहे मे, २०२२ मध्ये पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या कार्यक्षेत्रात एकूण ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एकूण ३ गुन्हे पैकी १) पोलीस अंमलदार २) सहायक पोलीस निरीक्षक ३) नाशिक ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अंमलदार यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक यांचेकडून कारवाई करण्यात आली असून संबंधीतांना अटक करण्यात आली आहे. या गुन्हयांचा तपास लाप्रवि., नाशिक यांच्यामार्फत सुरु आहे.
(२) उक्त गुन्हयातील आरोपी हे लोकसेवक असल्याने, त्यांना लाप्रवि, नाशिक यांचेकडून अटक झालेल्या तारखेपासून निलंबनाची कारवाई पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचेकडून करण्यात आली आहे.
पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे येथे लाच मागणे व देणे हा गुन्हा असल्याने

त्यासंदर्भात जनजागृती फलके लावण्यात आली असून त्यावर सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे वरिष्ठ स्तरावर वेळोवेळी होणाऱ्या बैठकांद्वारे आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सुचना देण्यात येत असतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जलतरण तलाव येथे समाजकंटकांकडून वस्तूची तोडफोड केल्याबाबत**

**(२९) ४५४६२ (२८-१०-२०२२). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जलतरण तलाव येथे समाजकंटकांकडून वस्तूची तोडफोड करण्यात आल्याची घटना दिनांक २२ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सार्वजनिक मालमत्तेचे लाखो रुपयांचे नुकसान होऊन देखील संबंधित समाजकंटकांच्या विरोधात पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पोलीस प्रशासनाकडून समाजकंटकांवर कारवाई करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :**(१) होय हे खरे आहे,
कोविड-१९ प्रादुर्भावामुळे दोन वर्षाच्या कालावधीनंतर जलतरण तलाव दिनांक १९/४/२०२२ पासून सदर सुरु झाला होता. त्यामुळे लोकांची जलतरण तलावाचे तिकिट मिळविण्याकरीता मोठ्या प्रमाणात गर्दी झाली व लोकांमध्ये आपआपसात वाद निर्माण झाला होता. सदर वाद सुरक्षा रक्षकाने हस्तक्षेप करुन मिटवला होता.
त्यादरम्यान अज्ञात व्यक्तींनी तलावातील चेंजींग रुममधील १५ ते २० प्लास्टिकचे शॉवर व पाईपचे किरकोळ नुकसान केले.
(२) व (३) हे खरे नाही.
सदर प्रकाराबाबत जलतरण तलाव प्रशासनाने संबंधित पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केलेली नाही. परंतु पुन्हा असा प्रकार होऊ नये यासाठी जलतरण परिसरात पोलीस घटकांकडून पेट्रोलींग गस्त ठेवण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**मुंबईत काही ठिकाणी रेसिंग पॉईंटवर दुचाकीस्वारांची जीवघेणी स्टंटबाजी सुरु असल्याबाबत**

**(३०) ४५५०८ (३१-१०-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत काही ठिकाणी सध्या रेसिंग पॉईंट म्हणून निदर्शनास येत असून सदर रेसिंग पॉईंटवर दुचाकीस्वारांची जीवघेणी स्टंटबाजी सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त स्टंटबाजीवर मोठ्या प्रमाणात सट्टाबाजीही होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्टंटबाजी करणाऱ्या दुचाकींस्वारांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि, मुंबई वाहतूक विभागाअंतर्गत रेसिंग स्टंटबाजी होऊ नये म्हणून प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने वेगवेगळया ठिकाणी अचानकपणे नाकाबंदी लावण्यात येत असते.

तसेच महत्वाच्या पश्चिम व पूर्व द्रुतगती महामार्ग व इतर महत्वाच्या रस्त्यावर वाहतूक विभागामार्फत सक्त गस्त घालण्यात येते. रस्त्यावर स्टंटबाजी व बाईक रेसिंग होणार नाही, यासाठी मुंबईतील वाहतूक विभागामध्ये पोलीस अंमलदारांची नियुक्ती करण्यात येते.

सोशल मिडीया, वाहतूक नियत्रंण कक्ष तसेच इतर कोणत्याही माध्यमातून बाईक रेसिंग संदर्भात माहिती प्राप्त झाल्यास नमूद ठिकाणी संबधित वाहतूक विभागामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील महावितरण कंपनीचे कर्मचारी ग्राहकांशी गैरवर्तणूक करीत असल्याबाबत

**(३१) ४५६३२ (२१-०९-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील महावितरण कंपनीचे कर्मचारी वीज देयकाचा भरणा करण्यासाठी ग्राहकांशी गैरवर्तणूक करुन चुकीच्या कार्यप्रणालीचा वापर करीत असल्याची तक्रार व्यापारी संघटनेने तहसिलदार, कुडाळ यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीचे कर्मचारी मार्च अखेर असल्याचे कारण सांगुन एका महिन्याचे देयक न भरलेल्या ग्राहकांचीही वीज जोडणी खंडीत करीत असून वीज देयक भरण्यासाठी गैरवर्तणूक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज देयके वसूलीसाठी ग्राहकांशी गैरवर्तणूक करणाऱ्या महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सदर बाबत व्यापारी संघटनेने तहसिलदार, कुडाळ यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली असल्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रामधून दि. ३०.०३.२०२२ रोजी प्रसारित झाली होती.

(२) हे खरे नाही.

विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ५६ नुसार थकबाकीची रक्कम विहीत मुदतीत न भरल्यास वीज पुरवठा खंडीत करण्याबाबत संबंधित ग्राहकाच्या महावितरणकडील नोंद असलेल्या क्रमांकावर नोटीसीचा संदेश पाठविण्यात येतो. ग्राहकाने वीज देयकाचा भरणा न केल्यास वीज पुरवठा खंडीत करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणनगर (जोगेश्वरी,मुंबई)येथील सी.टी.एस.क्र.१६९ हा म्हाडाचा भूखंड शासकीय कार्यालयासाठी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३२) ४५६६१ (२१-०९-२०२२). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रात बृहन्मुंबई महानगरपालिकेची के/पूर्व वप पी/दक्षिण ही दोन विभागीय कार्यालये येत असून या भागातील नागरिकांना शिधावाटप, शैक्षणिक, निवडणूक, दुय्यम निबंधक या विविध शासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त जावे लागत असून सदरहू सर्व कार्यालये सद्य:स्थितीत वेगवेगळया ठिकाणी कार्यरत असल्याने नागरिकांना तेथे ये-जा करण्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत जोगेश्वरी विधानसभा क्षेत्रातील कोकणनगर येथील सी.टी.एस.क्र.१६९ हा म्हाडाच्या नावे असलेला भूखंड हा वापरविना पडून असून या जागेवर मोठया प्रमाणात डेब्रिजचा साठा करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,
(३).असल्यास, सदरहू जागेवरील डेब्रिज हटवून हा भूखंड मोकळा करून त्यावर उपरोक्त नमूद तसेच अन्य विविध शासकीय विभागीय कार्यालयांकरिता जागा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय कार्यालयांमार्फत सुविधा देणे शक्य होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने सदरहू भूखंडावर शासनाच्या वेगवेगळया विभागांची कार्यालये एकत्र सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०२२ रोजी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, मुंबई यांना निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने या जागेवर शासनाच्या वेगवेगळया विभागांची कार्यालये सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) ते (६) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीचे वाटप) विनियम, १९८२ च्या विनियम-१६ अंतर्गत म्हाडाच्या निवासी/अनिवासी भूखंडाचे वितरण शासन निर्णय दि.२२/११/२००५ च्या तरतुदीनुसार करण्यात येते.
सदर शासन निर्णयातील तरतूद तसेच मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.८८२/२०११ व इतर यामध्ये दि.२०/०३/२०१४ व फौजदारी जनहित याचिका क्र.२/२०१२ मध्ये दि.०८ व ०९ ऑक्टोबर, २०१४ रोजी नोंदविलेले निष्कर्ष विचारात घेता, विनियम-१६ अंतर्गत म्हाडाच्या भुखंडाचे वितरण आता थेट करता येत नाही. त्यानुसार संबंधित स्थानिक लोकप्रतिनिधी यांना दि.७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे.

---

## वरगव्हाण (ता.चोपडा, जि.जळगाव) येथे ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याबाबत

**(३३) ४५६८४ (२१-०९-२०२२). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरगव्हाण (ता.चोपडा, जि.जळगाव) व परिसरातील शेतक-यांना पुरेश्या दाबाने वीज पुरवठा व्हावा याकरीता महावितरण कंपनीमार्फत ३३ के.व्ही. उपकेंद्र वरगव्हाण येथे उभारण्याबाबत मंजुरी देण्यात आल्यानंतर मा.जिल्हाधिकारी, जळगाव यांचे मार्फत वरगव्हाण येथे गट क्र.७४ मधील ६० आर. जमीन क्षेत्र प्रदान करण्याबाबत दिनांक ३० ऑगस्ट, २०१९ रोजी आदेश दिलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरची जागा ताब्यात घेऊन , ३ वर्षे उलटून गेले तरीही अद्याप ३३ के.व्ही. उपकेंद्र उभारण्याकडे संबंधित अधिका-यांचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री दिनांक १५ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे तक्रार करुन उक्त उपकेंद्र तात्काळ उभारण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन उपकेंद्र उभारण्याकडे दुर्लक्ष करणा-या अधिका-यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच वरगव्हाण येथे ३३ के.व्ही. उपकेंद्र सुरु करण्याच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.

(४) महावितरण मार्फत HVDS योजनेअंतर्गत ३३/११ केव्ही उपकेंद्रासाठी मौजे वरगव्हाण, ता. चोपडा येथील शासकीय जमिन गट क्र. ७४ मधील ०.६० आर जागेचा ताबा घेण्याबाबत स्थापत्य विभागाच्या अधिकाऱ्यामार्फत स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच स्थानिक प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. सद्यस्थितीत रस्ता पुराच्या पाण्यामुळे वाहून गेल्यामुळे सदर जागेपर्यंत जाणेसाठी रस्ता अस्तित्वात नाही. सदर रस्ता व संरक्षक भिंत तयार झाल्यानंतर जागेचा ताबा घेण्यात येईल. HVDS योजनेचा कालावधी पुर्ण होऊनही जागेचा ताबा न मिळाल्यामुळे सदर उपकेंद्राच्या प्रस्तावाचा समावेश आता पुन्हा नव्याने (RDSS) सुधारीत वितरण क्षेत्र योजनेअंतर्गत करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औसा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनासाठी स्वतंत्र रोहित्र मंजुर करण्याबाबत

**(३४) ४५८६२ (२२-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावातील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या विदयुत पंपाच्या वीजपुरवठयासाठी स्वतंत्र रोहित्राचे काम जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत मंजूर करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पालकमंत्री लातूर यांच्याकडे दिनांक २६ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील कामासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद लातूर जिल्हा नियोजन समीतीने वार्षिक आराखड्यात करावी अशी मागणी दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या लातूर जिल्हा नियोजन समीतीच्या आढावा बैठकीत पालकमंत्री लातूर यांच्याकडे केली आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, औसा विधानसभा मतदारसंघातील विदयुत पंपाच्या वीज जोडणी असलेल्या परंतु त्यासाठी स्वतंत्र रोहित्र नसलेल्या पाणी पुरवठा योजना किती आहेत व सदरील योजनेस स्वतंत्र रोहित्राचे काम करण्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे. तसेच सदरील निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) औसा विधानसभा मतदारसंघातील विद्युत पंपांच्या वीज जोडणी असलेल्या परंतु त्यासाठी स्वतंत्र रोहित्र नसलेल्या ३४१ पाणीपुरवठा योजना असून त्यापैकी २९ जोडण्यांना स्वतंत्र रोहित्र बसविण्यात आले असून ५२ पाणी पुरवठयाच्या योजनासाठी स्वतंत्र रोहित्र मंजूर केले आहे व त्यासाठी रु.२.०५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे. सदर निधीची मागणी जिल्हा नियोजन समिती लातूर यांच्याकडे सन २०२२-२३ साठी केली आहे. तसेच, इतर ५२ गावांमधील सार्वजनिक पाणीपुरवठा वीज जोडण्यांना स्वतंत्र रोहित्र बसविण्याबाबत प्रस्ताव बनविण्याचे काम प्रगतीपथावर असून उर्वरित २०८ ठिकाणाच्या पाणीपुरवठा विद्युत जोडण्यांना सद्यस्थितीत योग्य दाबाने व सुरळीत वीज पुरवठा चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लातूर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समीतीचा निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३५) ४५८६७ (२१-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यातील जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत विद्युत विभागासाठी सन २०२१-२०२२ या आथिक वर्षात नवीन रोहित्र व इतर विद्युत कामासाठी मंजूर असलेला निधी अखर्चित असल्याची बाब दिनांक १३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा नियोजन समीतीच्या बैठकीत निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व सदरील निधी अंतर्गत मंजूर कामे तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
लातूर जिल्हयाकरीता जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२१-२०२२ या वर्षाकरिता रु.२१२८.५५ लाख इतका निधी माहे मार्च २०२२ अखेर प्राप्त झाला होता.
(२) जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत लातूर जिल्हयाकरीता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता नवीन रोहित्र व इतर विद्युत कामासाठी रु.२१२८.५५ लाख इतका निधी माहे मार्च २२ अखेर प्राप्त झाला आहे व प्राप्त निधीच्या अनुषंगाने प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील कामे करुन घेण्याबाबत एकूण ८७ सूचीबध्द कंत्राटदारांना रु.२१.२८ कोटीचे ९४ कार्यादेश देण्यात आले असून उर्वरित कार्यादेश देण्याचे कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून अतिरिक्त वीज आकारणीची देयके येत असल्याबाबत

**(३६) ४५९११ (२१-०९-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना राज्य वीज वितरण कंपनीकडून अतिरिक्त शुल्क आकारणीची वीज देयके पाठविली असल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे मे,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , चौकशीत काय निष्पन्न झाले ,
(३) असल्यास, तदनुसार अतिरिक्त वीज आकारणी करणाऱ्या वीज बिल एजन्सी व सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) व (२) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके व पॉवर क्वालिटी विनियम, २०२१ मधील तरतूदीनुसार अतिरिक्त सुरक्षा ठेवीची स्वतंत्र देयके पाठविण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) येथे कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदार गावठी बंदूक (कट्टा) दाखवून देयके काढून घेत असल्याबाबत

**(३७) ४५९६७ (२५-१०-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथे बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता, संजयकुमार कोकणे यांचेकडून कंत्राटदाराने गावठी बंदूक (कट्टा) दाखवून देयके काढून घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यकारी अभियंता यांनी संरक्षणासाठी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शस्त्रपरवाना मागितला, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार गंभीर प्रकाराबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने व शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) तसेच बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना धमक्या देवून देयके काढणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) अशा प्रकाराची घटना घडल्याबाबत संबंधित पोलीस स्टेशन येथे कोणत्याही प्रकराची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) सदर कार्यकारी अभियंता यांनी स्वत: च्या संरक्षणासाठी जिल्हाधिकारी कर्यालय बीड यांचेकडे शस्त्र परवाना मिळण्याबाबत विनंती केली होती परंतु त्योचेविरुध्द पोलीस स्टेशन अंबाजोगाई, बीड येथे गु.र.नं. २७४/२०२२ लाचलुचपत अधिनियम कलम ७ अन्वये गुन्हा दाखल असल्यामुळे त्यांना शस्त्र परवाना देण्यात येऊ नये असे अभिप्राय उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई यांनी जिल्हाधिकारी, बीड यांना दिले आहेत.
(३) व (४) संबंधित पोलीस स्टेशनला याबाबतची तक्रार प्राप्त नसल्याने कार्यवाही करण्यात आली नाही.
(५) विलंब झालेला नाही.

---

## बुलढाणा जिल्ह्यातील दोन प्रकल्पाच्या कंत्राटदाराविरोधात बनावट कागदपत्रे तयार करुन फसवणूक केल्याबाबत

**(३८) ४६०४७ (२८-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव, पेनटाकळी, खडकपूर्णा आणि हिरडव या प्रकल्पांपैकी दोन प्रकल्पाच्या कंत्राटदाराविरोधात बनावट कागदपत्रे तयार करुन त्याचा वापर शासनाची फसवणूक करताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हे दाखल केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणत्या कलमांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) होय हे खरे आहे. परंतु सदर प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने माहे, एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान गुन्हे दाखल केलेले नसून, सदरचे गुन्हे हे सन २०१७ मध्ये जिगाव प्रकल्पासंबंधाने, सन २०२० मध्ये पेनटाकळी व हिरवड प्रकल्पासंबंधाने गुन्हे दाखल आहेत व खडकपूर्णा प्रकल्पासंबंधाने उघड चौकशी सुरु आहे.
(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील वरील प्रकल्पांच्या अनुषंगाने खालील प्रमाणे गुन्हे/ चौकशी सुरु आहे :-
जिगाव : प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेत गैरहेतूने बनावट दस्तऐवज खरे आहेत, असे भासवून शासनाची फसवणूक केली आहे. त्या संदर्भात पोलीस ठाणे खामगाव, जिल्हा बुलढाणा येथे गुन्हा नोंद क्रमांक ४५२/२०१७ कलम ११९, ४२०, ४६६, ४६८, ४७१, ४७४, १९२, १९३, १९७, १९८, १२०७, १२० (ब), १०९, भा.द.वि. सहकलम १३ (१) (क) (ड), १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दिनांक ०३/११/२०१७ रोजी श्री. सुमीत रमेशचंद्र बाजोरिया, संचालक, मे. बाजोरिया कन्स्ट्रक्शन कंपनी, यवतमाळ व ७ जलसंपदा विभागातील अधिकारी यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपी श्री. सुमीत रमेशचंद्र बाजोरिया यांच्याविरुद्ध दिनांक २४/०२/२०२० रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

पेनटाकळी : आरोपी श्री. तानाजी एकनाथ जंजीरे व श्री. इश्वरसिंह राजपूत, तत्कालीन कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, चिखली यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन, चिखली, जिल्हा बुलढाणा येथे गुन्हा नोंद क्रमांक १०८/२०२० कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ भा.द.वि सह कलम १३ (१) (क) (ड), १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दिनांक १२/०२/२०२० रोजी दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपी श्री. तानाजी एकनाथ जंजीरे यांच्याविरुद्ध दिनांक १७/०५/२०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

हिरवड : आरोपी श्री. अरुण गुलाब मापारी व श्री. प्रभाकर नामदेव नारखेडे, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे गुन्हा नोंद क्रमांक ७१/ २०२० कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ भा.द.वि. सह कलम १३ (१) (क) (ड), १३ (२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ अन्वये दिनांक १२/०२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपी श्री. अरुण गुलाबराव मापारी यांच्याविरुद्ध दिनांक ०६/०५/२०२२ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्हा सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

खडकपूर्णा : सदर प्रकल्पा संबंधाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## मेहकर, सिंदखेडराजा, लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यात वीज ग्राहकांसाठी मेहकर येथे महावितरणाचे विभागीय कार्यालय सुरु करण्याबाबत

**(३९) ४६०५१ (१४-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर, सिंदखेडराजा, लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यात वीज ग्राहकांची समस्या लक्षात घेऊन मेहकर येथे महावितरणाचे विभागीय कार्यालय सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मेहकर विभागीय कार्यालय निर्मितीबाबत आर्थिक दायित्वाचा विचार करुन उचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिवरा खुर्द ( ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील शेतकऱ्यांना वीज जोडणी देण्याबाबत

**(४०) ४६०५४ (१४-१०-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरा खुर्द (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील शेतक-यांनी ५ खांब व कृषि पंपासाठी वीज जोडणीचे पैसे सन २०१६ मध्ये भरणा करुन देखील अद्यापर्यंत वीज खांब उभारणी व वीज जोडणी देखील करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज जोडणी करण्यात आली नसून देखील या शेतक-यांस सन २०१९ पासून वीज देयक येत असून या शेतक-यांकडे १६ हाजार ६६० रुपये थकबाकी दाखवली असल्याची बाब ऊर्जा मंत्री यांच्या दौ-या दरम्यान माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शेतकऱ्यांनी निदर्शनास आणली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शेतकऱ्यांना वीज खांब व कृषि पंपाची जोडणी तात्काळ देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
हिवरा खुर्द, ता. मेहकर या गावामध्ये सन २०१६ मध्ये किंवा तत्पुर्वी कृषीपंप वीज जोडणीकरीता पैसे भरलेल्या व तांत्रिकदृष्ट्या सुसाध्य असलेल्या कृषीपंपाना वीज जोडणी देण्यात आलेल्या आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) उक्त प्रकरणी चौकशी केली असता मौजे हिवरा खुर्द, ता. मेहकर येथील श्री. रमेश सखाराम नागरगोजे यांनी हिवरा खुर्द येथील गट नं. ३५१ मध्ये दि.१८.०८.२०१६ रोजी सिंगल फेज Precooling Plant वीज जोडणी करीता अर्ज केलेला होता व त्यानुसार दि.२४.०८.२०१८ रोजी वीज जोडणी देण्यात आली असल्याचे उपलब्ध रेकॉर्ड वरुन निदर्शनास आले आहे. मात्र दिलेली वीज जोडणी प्रत्यक्षरित्या न करता संबंधितांव्दारे System मध्ये चुकीने NSC भरली गेली असल्याने दि.१८.०७.२०२१ रोजी कायमस्वरुपी खंडीत करण्यात आली आहे. या प्रकरणी असे निदर्शनास येते की, श्री. नागरगोजे यांनी मागणी केल्यानुसार सिंगल फेजची वीज जोडणी प्रत्यक्षरित्या न देता केवळ System मध्ये NSC भरुन वीजजोडणी झाल्याचे दर्शविल्याने संबंधित तसेच तत्कालीन सहाय्यक अभियंता, जानेफळ वितरण केंद्र यांना आरोपपत्र देण्यात आले होते.

विभागीय चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या अभियंत्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली असून वेतनवाढ रोखण्याची शिक्षा प्रस्तावित करण्यात आली आहे.
(४) श्री. नागरगोजे यांनी कृषीपंप वीजजोडणीसाठी स्वखर्चाने वाहीनी उभारणीची तयारी दर्शविल्याने त्यांचे अंदाजपत्रक १.३% DDF (ग्राहकाधिष्ठित वितरण सुविधा) मध्ये मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार श्री. नागरगोजे यांचेतर्फे वीज वाहिनी उभारणीचे कामे पूर्ण झाल्यानंतर दि.३०.१०.२०२२ रोजी त्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे.

---

**भुसावळ हद्दीमध्ये अवैध गुटखा तस्करी होत असल्याबाबत**

**(४१) ४६०८४ (३१-१०-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ हद्दीमध्ये पकडण्यात आलेल्या अवैध गुटखा तस्करीची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय यांच्याकडे दिनांक २१ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१) होय हे खरे आहे.
(२) व (३) भुसावळ येथे अवैध गुटखा तस्करी प्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाणे यांनी छापा टाकून गु.र.क्र.४१/२०२२, भारतीय दंड संहिता कलम ३२८,२७२,२७३,१७९,१८८,३४ सह, अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६, नियम व नियमन २०११ चे कलम २६ (२) (i), २७, ३० (२) (a) सह, कलम २६९ (२) (iv), ३ (१) (zz) (i) (v), २७ (३) (e), ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**हिंगणा (नागपूर) ग्रामपंचायत मोंढा क्षेत्रातील रिंग रोड ते कांचनगंगा पर्यंत पथ दिवे खांब लावून देण्याबाबत**

**(४२) ४६१४७ (२०-०९-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणा विधानसभा मतदार संघातील (जि.नागपूर) ग्रामपंचायत मोंढा क्षेत्रातील रिंग रोड ते कांचनगंगा पर्यंत पथदिवे खांब लावून देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान महाराष्ट्र राज्य विद्यत वितरण कंपनी लि. बुटीबोरी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी निवेदन देऊनही अद्यापही पथ दिवे खांब बसविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बुटीबोरी व हिंगणा औद्योगिक वसाहतीतील कारखान्यांमध्ये रात्री-अपरात्री नोकरदारांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोणातून तातडीने रिंग रोड ते कांचनगंगा पर्यंत पथ दिवे लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
संरपच ग्रामपंचायत मोंढा यांच्या नावे पथदिव्यांच्या ३ वीज जोडण्या असून त्यांची एकूण रु. ५,५५,८८० इतकी थकबाकी आहे. महावितरणच्या दि. १४.०५.२०१८ च्या परिपत्रकानुसार पथदिव्यांची थकीबाकी कमी करण्याकरिता व नवीन पथदिव्यांना वीज जोडणी मंजूरी करताना ग्रामपंचायत/नगरपालिका/महानगरपालिकेने त्यांच्या अखत्यारित सद्य:स्थितीत असणाऱ्या सर्व पथदिव्यांची थकबाकी भरल्याशिवाय सदर ठिकाणी पथदिव्यांची नवीन अथवा वाढीव वीज जोडणी देण्यात येत नाही.
(३) सरपंच, ग्रामपंचायत मोंढा यांनी पथदिव्यांची थकबाकी भरल्यानंतर व ग्रामपंचायत मोंढा क्षेत्रातील रिंग रोड ते कांचनगंगा पर्यंत पथदिवे खांब लावून देण्याबाबतच्या प्रस्तावास जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून मंजूरी प्राप्त झाल्यानंतर सदर ठिकाणी वाढीव पथदिवे उभारण्याचे काम करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथे खान बहादूर होरमसजी मानेकजी भिवंडीवाला ट्रस्टच्या जमिनीचे बनावट दस्तऐवज करुन जमिन परस्पर विकल्याबाबत

**(४३) ४६१६६ (२७-१०-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई येथे खान बहादूर होरमसजी मानेकजी भिवंडीवाला ट्रस्टच्या जमिनीचे बनावट दस्तऐवज करुन ट्रस्टमधील काही सदस्यांनी ट्रस्टचे नाव जमिनीच्या नोंदीवरुन काढून टाकून ही जमिन परस्पर विकली असल्यामुळे मुंबईतील एल.टी. मार्ग पोलिसांनी दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणात आतापर्यंत किती जणांवर कोणत्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदर गुन्ह्यांची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
दिनांक ०५/०७/२०२२ रोजी एल.टी.मार्ग पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र.८६/२०२२ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४१८, ४२०, ४२३, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ४७४, १२० (ब), ३४ अन्वये संबंधित तीन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदरचा गुन्हा पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या दि.१३/०५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.
(३) सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून सदर तक्रार गैरसमजुतीतून दाखल झालेली असल्याने सदर तक्रार "क" वर्ग समरी मंजुरीकरिता अंतिम अहवाल दि.२३/११/२०२२ रोजी मा.न्यायालयात सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भांडुप (मुंबई) परिमंडळातील नादुरुस्त वीजेच्या मीटरबाबत

**(४४) ४६२२३ (१४-१०-२०२२). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील भांडुप परिमंडळात ९५ हजार नादुरुस्त वीजेचे मीटर असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नादुरुस्त वीजेचे मीटरमुळे आलेले अवाजवी वीज देयके सुधारीत दराने वितरीत करुन सदरहू मीटर बदलून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

भांडुप परिमंडळात एप्रिल २०२२ च्या दरम्यान ११२९८० नादुरुस्त मीटर असल्याचे निदर्शनास आले होते.

(२) प्रत्यक्ष मीटर वाचन उपलब्ध नसल्यास सदर ग्राहकांना त्यांच्या मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयके आकारण्यात येतात. तपासणीअंती नादुरुस्त वीज मीटरपैकी १६४१५ सुस्थितीत आढळल्याने नॉर्मल प्रमाणे बिलिंग करण्यात आले. १५२१७ नादुरुस्त वीज मीटर बदलण्यात आले व उर्वरीत मीटर बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदोष देयक असलेल्या ३०६४ ग्राहकांना सुधारीत वीज देयक देण्यात आली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुगलच्या शोध इंजिनमध्ये असलेल्या ‘एडीट’ या पर्यायाचा गैरफायदा घेऊन ग्राहकांची फसवणूक केल्याबाबत

**(४५) ४६२५६ (३१-१०-२०२२). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत गुगलच्या शोध इंजिनमध्ये असलेल्या ‘एडीट’ या पर्यायाचा गैरफायदा घेऊन दादर मधील दुकांनाची नावे टाकून ग्राहकांची फसवणूक केल्याचा प्रकार दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका पुस्तक विक्रेत्यांच्या दुकानाच्या फोटोसह सर्व माहिती अपलोड करुन ग्राहकांकडून ऑर्डर घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुस्तके न पोहचल्यामुळे ग्राहकांनी दुकानात येऊन तक्रारी केल्यानंतर सदरहू प्रकार निदर्शनास आला असून संबंधित पुस्तक विक्रेत्यांने शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन ऑनलाईन पुस्तक विक्रितून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय हे खरे आहे. नमूद गुन्ह्यामध्ये अज्ञात इसमाने +९१६००११४८७७४ हा नंबर परस्पर नोंदवून एका पुस्तक विक्रेत्याच्या दुकानाच्या नावाचा लबाडीने अप्रामाणिकपणे वापर केल्याने त्यांच्याविरूध्द वि.स्था. गु.र.क्र. २६/२०२२ कलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर गुन्हयात कलम ४२० भा.द.वि.सं. या कलमाची वाढ करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे सुधारित अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत**

**(४६) ५२५३८ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यातील कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाच्या बांधकामास सन २००७-०८ मध्ये रु.२६२.२५ कोटीस मुळ सूप्रमा व सन २०१३-१४ मध्ये रु.९४७.२३८ कोटीस प्रथम सूप्रमा देण्यात आलेली असून नवीन दरसुचीनुसार या प्रकल्पाच्या किमंतीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्याने या प्रकल्पाचे रु. १६६९.०० कोटीचे सुधारित अंदाजपत्रक तयार करून अंतिम मान्यतेसाठी सचिव जलसंपदा मंत्रालय मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कन्हान नदीवरील कोच्छी बॅरेज प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी व सुधारित अंदाजपत्रकास निधीसह सूप्रमा मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. कन्हान नदी प्रकल्प (कोच्छी बॅरेज) च्या मुळ प्रशासकीय मान्यता प्रस्तावास सन २००७-०८ मध्ये रु. २६२.२५ कोटीस मान्यता प्राप्त आहे. तसेच दि.१८/०३/२०१७ ला रु. ९४७.२३८ कोटीस प्रथम सुप्रमा प्राप्त आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकल्पाचा द्वितीय सुप्रमा प्रस्ताव नवीन दर सुचीनुसार रु. १६६९.८७ कोटी चा तयार करण्यात आला असुन वि.पा.वि.म., नागपुर यांचे दि. ११.११.२०२२ रोजीचे पत्रान्वये राज्य तांत्रीक सल्लागार समीती कार्यालय, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आला होता, त्यावर रा.तां.स.स. कडुन दि. १८.११.२०२२ व दि. २०.०१.२०२३ अन्वये मुददे उपस्थित करण्यात आले आहे. सदर मुदयांचे अनुपालन करुन प्रस्ताव रा.तां.स.स. कार्यालयास सादर करण्याच्या प्रक्रियेत आहे.
(२) प्रकल्पांतर्गत बॅरेजचे बांधकाम ९०% पुर्ण झालेले आहे. द्वार निर्मिती कामे पुर्ण झालेली असुन द्वार उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे. पुनर्वसन नागरी सुविधा, फिडर पाइप लाइन, अग्रस्थ नियंत्रक व इतर कामे जुन २०२५ अखेर पुर्ण करणे नियोजीत आहे. तसेच सुप्रमा प्रस्तावातील रा.तां.स.स., नाशिक कडुन उपस्थित मुदयांचे अनुपालन करुन सुप्रमा प्रस्तावास लवकरात लवकर मान्यता मिळविण्याच्या दृष्टिने कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंगणगाव (ता.येवला, जि.नाशिक ) येथील गट न. १५,१६ व १९ मधील अतिरिक्त व विनावापर असलेली जमिन महापुरुषांचे स्मारक उभारण्यासाठी देण्याबाबत**

**(४७) ५२५५० (२०-०१-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणगाव (ता.येवला, जि.नाशिक) येथील गट न. १५,१६ व १९ मध्ये असलेल्या पालखेड पाटबंधारे वसाहतीमधील अतिरिक्त व विनावापर असलेली २ एकर जमीन महापुरुषांचे स्मारक उभारण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला हस्तांतरित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक . २९ सप्टेंबर २०२२ व १४ नोव्हेंबर २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग,नाशिक यांनी इमारती व मोकळया जागा समितीच्या अध्यक्षांना उक्त मोकळी जागा सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा येवला नगरपरिषदेला महापुरुषांच्या स्मारकासाठी हस्तांतरित करण्यासाठी दि.४ फेब्रुवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रस्ताव पाठविलेला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंगणगाव (ता.येवला, जि.नाशिक) येथील गट न. १५,१६ व १९ मधील जलसंपदा विभागाची अतिरिक्त व विनावापर पडून असलेली २ एकर जागा महापुरुषांच्या स्मारकासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा येवला नगरपरिषदेला हस्तांतरित करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
अंगणगाव (ता. येवला, जि.नाशिक) येथील गट नं.१५,१६ व १९ मधील अतिरिक्त व विनावापर असलेली २ एकर जागा महापुरुषांच्या स्मारकासाठी येवला नगरपरिषदेला हस्तांतरीत करण्यासाठी श्री.छगन भुजबळ (तत्कालिन मंत्री अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग) यांनी दि.२५.०३.२०२२ रोजी तत्कालिन जलसंपदा मंत्री यांच्याकडे व दि.२६.११.२०२२ रोजी मा. उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री महोदयांकडे विनंती केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) जलसंपदा विभागाकडे असलेल्या व अतिरीक्त ठरलेल्या जमीनीबाबत सर्वकष धोरण निश्चित झाल्यावर अशा प्रकरणात कार्यवाही करणे उचित राहील असा निर्णय गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिकमध्ये शालेय विद्यार्थ्यांकडून मैत्रीच्या नावाखाली खंडणी वसूल केली जात असल्याबाबत

**(४८) ५२५७१ (१८-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरातल्या नामांकित इंग्रजी माध्यमातील शाळांमध्ये शिकणा-या विद्यार्थ्यांशी आधी मैत्रीचा हात पुढे करुन नंतर त्यांना घाबरवून खंडणी वसूल करण्याचा धक्कादायक प्रकार माहे ऑक्टोबर २०२२ , मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शालेय विद्यार्थ्यांना बंदूकीचा धाक दाखवून त्यांच्या घरातील लाखो रुपयांचे दागिने लुबाडले गेल्याचा प्रकार गंगापूर पोलीस स्टेशन हद्दीत घडून आला असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
त्याअनुषंगाने संबधति दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०२-२०२३) :**(१), (२) व (३) नाशिक शहर, गंगापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत दिनांक १८/७/२०२२ रोजी १५ वर्षाच्या मुलाला आरोपीने बंदुकीचा धाक दाखवून एकुण रुपये ४,९५,०००/- इतक्या किंमतीचे सोन्याचे व हिऱ्याचे दागिणे घरातुन आणून आरोपीस देण्यास भाग पाडले.
सदर प्रकरणी आरोपीविरुध्द गु.र.नं २०४/२०२२ भा.दं.वि. कलम ३८४ अन्वये गंगापूर पोलीस स्टेशन, नाशिक येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असून सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

### चाकसमान प्रकल्पाच्या अपूर्ण कामासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता (सुप्रमा) मिळणेबाबत

**(४९) ५२५८२ (२९-०१-२०२३).ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हयातील शिरुर व खेड तालुक्याला वरदान ठरलेल्या चासकमान डावा कालवा १४४ किलोमिटर अंतराचा असून कालव्यामध्ये झाडेझुडपे व कॅनोल अस्तरीकरणाअभावी व कालव्यावरील बांधकामांमधून पाण्याची गळती होत असल्याने लाखो लिटर पाणी वाया जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चासकमान प्रकल्प सद्य:स्थितीत बांधकामाधीन असून अद्याप संपूर्ण वितरण प्रणालीकरिता आवश्यक भूसंपादन झालेले नसल्यामुळे पुच्छ भागात काही ठिकाणी पोटचाऱ्या गाडून टाकल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पास तृतीय सुप्रमा प्राप्त करून घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू असून अस्तरीकरण करण्यासाठीची तरतूद तृतीय सुधारीत प्रशासकिय मान्यता प्रस्तावात अंतर्भूत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चासकमान डावा कालवा किमी १ ते १४४ मध्ये प्राधान्याने मोठ्या प्रमाणात गळती होत असलेल्या बांधकामांची दुरुस्ती व आवश्यकतेनुसार निवडक ठिकाणी अस्तरीकरण या गळती प्रतिबंधक उपाययोजना करावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करुन ही कामे महामंडळ स्तरावर खास बाब म्हणून सिंचन तसेच पुनर्स्थापना निधीमधून करण्याबाबत तसेच तृतीय सुप्रमा प्राप्त करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

कालव्याच्या संपूर्ण लांबीत अस्तरीकरण न झाल्यामुळे कालव्यामधून पाणी गळती होते.
(२) अंशत: खरे आहे.

चासकमान प्रकल्प योजने करीता एकूण ७९८१.३४ हे. खाजगी क्षेत्राचे भूसंपादन करावे लागणार असून त्यापैकी ६८१७.५५ हे. क्षेत्राचे संपादन झाले आहे. एकूण ११६३.७९ हे.आर. क्षेत्रापैकी ११२५.५६५ हे. क्षेत्रावर बंदिस्त नलीकाव्दारे वितरण व्यवस्थेची कामे करण्याचे तृतीय सुप्रमा अहवालात प्रस्तावित आहे.
नविन भूसंपादन कायदा सन २०१३ अस्तित्वात येण्यापूर्वी शासन धोरणानुसार ज्या ठिकाणी जमिन संपादित न करता कालवे/वितरीका/लघुवितरीकांची कामे झाली आहेत,त्या ठिकाणी भूसंपादन करण्याऐवजी जमिनीखालून बंदिस्त नलिका वितरण प्रणालीद्वारे सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत.ज्या क्षेत्रामध्ये बंदिस्त नलिकेद्वारे पाणी वितरण प्रस्तावित आहे, त्या क्षेत्राचा मोबदला संबंधित खातेदारांना अद्यापपर्यंत न दिल्यामुळे व काही ठिकाणी कालवा कार्यान्वित नसल्यामुळे, काही ठिकाणी पोटचाऱ्या शेतकऱ्यांनी बुजविल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) होय. चासकमान प्रकल्पास तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) चासकमान डाव्या कालव्यातून पूर्ण क्षमतेने पाणी टेलच्या भागात पोहचण्यासाठी व कॅनालची गळती रोखण्यासाठी डाव्या कालव्यास किमी ० ते ७२ मध्ये अस्तरीकरण करणेची निविदा काढण्यात आलेली असून १६ किमी अस्तरीकरण पूर्ण झाले आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर उर्वरित अस्तरीकरणाची कामे करण्याचे नियोजित आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहराची तहान भागविण्यासाठी टाटा पॉवर कंपनीकडून भिरा जलविद्युत केंद्रात विज निर्मिती केल्यानंतर समुद्रात सोडण्यात येणारे मुळशी धरणातील पाणी पुण्यासाठी वापरण्याबाबत

**(५०) ५२६६० (२२-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील टाटा पॉवर कंपनीकडून भिरा जलविदयुत केंद्रात विज निर्मिती केल्यानंतर समुद्रात सोडण्यात येणारे मुळशी धरणातील पाणी पिण्याच्यापाण्यासाठी वापरण्याचा पर्याय सुचविण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुळशी ते खडकवासला या मार्गात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) तत्त्वावर १८ किलोमीटर लांबीचा बोगदा बांधणे किंवा मुळशी धरणाखाली आणखी एक धरण बांधण्याची योजना राज्य सरकारने नेमेलेल्या समितीने सुचविली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, समितीने सुचविली योजना अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०२३) :** (१) नाही.

राज्य शासनाने शासन निर्णय दि.०२/०८/२०१८ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समूहास वीज निर्मितीसाठी कृष्णा खो-यातून विपुलतेच्या खोऱ्यात वळविण्यात येणारे पाणी टप्प्या टप्प्याने कमी करण्याकरिता

अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट गठीत करण्यात आलेला होती व या समितीचा अहवाल सदस्य सचिव तथा अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे कार्यालयाचे दि.१०/०५/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय दि.०२/०८/२०१९ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहातुन वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात (कोकण) वळविण्यात येणारे पाणी टप्प्या- टप्प्याने कमी करण्याकरिता गठित भावे समितीच्या अहवालावर अभ्यास करून पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्याबाबत तज्ञ समिती (सुर्वे समिती) गठित केली आहे. अद्यापपर्यंत सदर समितीच्या अकरा बैठका झाल्या असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) राज्य शासनाने शासन निर्णय दि.०२/०८/२०१९ अन्वये कोयना जलविद्युत प्रकल्प व टाटा जलविद्युत प्रकल्प समुहातुन वीज निर्मितीसाठी कृष्णा खोऱ्यातून विपुलतेच्या खोऱ्यात (कोकण) वळविण्यात येणारे पाणी टप्प्या-टप्प्याने कमी करण्याकरिता गठित भावे समितीच्या अहवालावर अभ्यास करून पुढील धोरण व कार्यवाहीची दिशा निश्चित करण्याबाबत तज्ञ समिती (सुर्वे समिती) गठित केली असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. अद्यापपर्यंत सदर समितीच्या अकरा बैठका झाल्या असुन पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

सदर अभ्यासानंतर तज्ञ समितीचा अंतिम अहवाल शासनास सादर झाल्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.